रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक १३ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. १९ जून २०२४

किंमत ४ ₹

## प्रियकराने केली प्रेयसीची हत्या

**वसई :** भररस्त्यात एका प्रियकराने आपल्या प्रेयसीवर लोखंडी पान्याने वार करून हत्या केली. वसई पूर्वेच्या गावराई पाडा येथे मंगळवारी सकाळी ही घटना घडली. हत्येनंतर आरोपी घटनास्थळावरच बसून होता. त्याला वालीव पोलिसांनी अटक केली आहे. नालासोपारा येथे राहणारा रोहित यादव (२९) आणि आरती यादव (२२) या दोघांचे मागील सहा वर्षांपासून प्रेम संबंध होते. मात्र आरती अन्य मुलाशी बोलत असल्याचा रोहित याला संशय होता. यावरून त्या दोघांमध्ये भांडणे होत होती. त्यामुळे रोहित पान २ वर

## लक्ष्मण हाकेंची प्रकृती बिघडली

**जालना :** राज्यात आरक्षणाच्या मुद्द्यावरुन वातावरण चांगलंच तापलं आहे. मनोज जरांगे यांच्या उपोषणाची दखल घेत राज्य सरकारने मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी १ महिन्यांचा अवधी मागितला. त्यानंतर, मनोज जरांगे यांनी आपलं उपोषण मागे घेतलं. मात्र, दुसरीकडे ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही, याची गॅरंटी द्या, अशी मागणी करत लक्ष्मण हाके वडीगोद्री गावात उपोषणाला बसले आहेत. गेल्या २ दिवसांपासून त्यांच्या उपोषणाला पाठिंबा वाढत असून त्यांनी पाणीही पान २ वर

### अनधिकृत बांधकामामुळे दरड कोसळण्याची भिती

# ‘सुरई’वर धनदांडग्यांची वक्रदृष्टी



गावालगत असलेल्या डोंगरावर दत्त मंदिर व परिसराची जागा ट्रस्टच्या नावाची आहे. सुशोभिकरणाच्या नावाखाली धनदांडग्यांसाठी बांधकाम करण्याचा प्रयत्न काही मंडळींकडून करण्यात आला आहे. ग्रामस्थांना विश्वासात न घेता भारत मोती, जीवन परदेशी यांनी बांधकाम सुरु केले. गावासह ग्रामस्थ, महिलांच्या सुरक्षेसाठी या बांधकामाला विरोध करण्यात आला आहे.
– सुरई महिला मंडळ

> सुरई येथील बांधकाम प्रश्नाबाबत कायदा व सुव्यवस्था बिघडू नये यासाठी आमची भूमिका राहिली आहे. तहसीलदार व बांधकाम विभागाचे अधिकारी, ग्रामस्थ यांची संयुक्त बैठक घेऊन यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न राहणार आहे.
> – विनित चौधरी, पोलीस उपविभागीय अधिकारी, अलिबाग

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

सुरईसह अनेक गावांचे श्रध्दास्थान असलेल्या दत्त मंदिराच्या डोंगरावरील परिसरात धनदांडग्यांनी बेकायदेशीररित्या खोदकाम, बांधकाम सुरु केले आहे. त्यामुळे डोंगर कोसळून सुरई गावाला धोका निर्माण होण्याची भिती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. ही खोदाई व बांधकाम बंद पाडण्यासाठी ग्रामस्थांसह महिलांनी आक्रमक भूमिका घेतली. शिंदे गटाकडून धनदांडग्यांना अभय दिले जात असल्याचा आरोप यावेळी स्थानिकांनी केला आहे. हा लढा शेवटपर्यंत राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

सुरई गावापासून काही अंतरावर निसर्गाच्या सानिध्यात सपाट डोंगर आहे. बाजुलाच दत्त मंदिर आहे. या मंदिरात दरवर्षी जयंती, पान २ वर

> पर्यटनासाठी निधी आला होता. दरडीचे कारण सांगून सुरई ग्रामस्थांनी विरोध दर्शविला. शासनाला तो अहवाल पाठविणार आहोत.
> – रमेश गोरे, उपअभियंता सा.बां. विभाग मुरुड

### शाळकरी मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

डोगरांच्या पायथ्याशी असलेल्या सुरई गावात जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडी आहे. मंदिरात जाण्याचा रस्ता याच शाळेकडून जात आहे. हा रस्ता अरुंद व वळणाचा आहे. तरीदेखील या रस्त्यावर पोकलन व अन्य अवजड वाहनांची वाहतूक करण्यात आली. त्यामुळे शाळकरी मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून नागरिकांची सुरक्षा धोक्यात येण्याची भिती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

### पंढरपूर-कराड रस्त्यावर अपघात

# ५ महिला ठार, ३ गंभीर



**। सांगोला । प्रतिनिधी ।**

पंढरपूर -कराड रस्त्यावरील कटफळ येथे भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या महिलांना धडक दिली. यामध्ये पाच महिलांचा जागीच मृत्यू झालाय. तर तीन महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. जखमी महिलांना उपचारासाठी पंढरपूरला हलविण्यात आले आहे.

दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक भीमराव खणदाळे, पोलीस फौजफाट्यासह घटनास्थळी दाखल झाले आहेत. ग्रामस्थांनी ट्रक चालकास पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले.

अपघातील मृत आणि जखमी महिला सांगोल्यातील कटफळ येथील रहिवासी आहेत. या महिला मोलमजुरीचे काम करण्यासाठी चिकमहूद येथील शेतावर गेल्या होत्या. काम संपल्यानंतर दुपारी घरी जाण्यासाठी त्या पंढरपूर - कराड रोडवर एसटीची वाट पाहत थांबल्या होत्या. त्याचवेळी पंढरपूरकडून भरधाव जाणाऱ्या ट्रकने त्यांना उडवले. आज दुपारी चार वाजता हा भीषण अपघात झाला.

**आजचा अग्रलेख**
**नवे दलित राजकारण**

**वे|ध|क**

### उद्घाटनाआधीच कोसळला पूल

**बिहार :** बांधकाम सुरु असलेला पूल कोसळल्याची धक्कादायक घटना बिहारच्या अररियामध्ये घडली आहे. कोसळलेला पूल बनवण्यासाठी १२ कोटी रुपयांचा खर्च आल्याची माहिती आहे. त्यामुळे पुलाच्या कामात गैरव्यवहार झाल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, या घटनेचा व्हिडीओ व्हायरल सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. पूल कोसळल्यानंतर एसपी सिंगला कंपनीत गार्ड म्हणून काम करणारा एक व्यक्ती बेपत्ता असल्याचे सांगण्यात येत आहे. त्याचा मृतदेह अद्याप सापडलेला नाही.

### कार दरीत कोसळून तरुणीचा मृत्यू

**खुलताबाद:** सुलीभंजन दत्तधाम मंदीर परिसरात रिल्स काढण्याच्या नादात कार डोंगरच्या दरीत कोसळून भीषण अपघातात तरूणीचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना दुपारी घडली होती. याप्रकरणी खुलताबाद पोलीस ठाण्यात मयत तरूणीसोबत असलेल्या युवकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी युवकाला अटक केली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, तरूणी श्वेता हिचा भाऊ मनिष सरोसे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, सुरज संजय मुळे याने श्वेता हिस छत्रपती पान २ वर

# उमटे धरणाच्या मालकांनी तोंड लपवले

- महसूल यंत्रणा आली धावून, कृषीवलच्या वृत्ताची दखल
- जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांचे निलंबन करण्याची मागणी




**। रायगड । । खास प्रतिनिधी ।**

उमटे धरणाच्या ओव्हरफ्लोची भिंत अतिशय धोकादायक झाली आहे. यंदाच्या पावसाळ्यात ती फुटून मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता असल्याचे वृत्त दैनिक कृषीवलने शनिवारी १५ जुनच्या अंकात उमटे धरण फुटीचा धोका या मथळ्याखाली वृत्त प्रसिध्द केले होते. महसुल विभागाने याची तातडीने दखल घेतली. मंगळवारी धरणाच्या भिंतीची पाहणी करण्यासाठी अलिबाग तहसलिदार विक्रम पाटील यांनी तलाठी, मंडळ अधिकारी यांना पाठवले. परंतु, ज्यांच्या मालकीचे हे धरण आहे, ती रायगड जिल्हा परिषद मात्र, कोठे तोंड लपवून बसली आहे, असा सवाल त्या निमित्ताने उपस्थित केला जात आहे.

कोकणात दरवर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असतो. या कालावधीत दरडी पडणे, महापूर, इमारतींची पडझड यासह अन्य प्रकारची आपत्ती येत असते. अलिबाग तालुक्यात १९७८ साली उमटे धरणाची निर्मिती करण्यात आली आहे. सध्या धरणाच्या ओव्हरफ्लोच्या भिंतीची दुरवस्था झाली आहे. भिंतीची चार-पाच ठिकाणी पडझड झाली असून एका ठिकाणी भलेमोठे भगदाड पडले आहे. त्यामुळे पावसाळ्याच सदर भिंतीला धोका पोहोचण्याची अधिक शक्यता आहे. धरण परिसरामध्ये ४७ गावे आणि ३३ आदिवासी वाड्या असून सुमारे तीन लाख लोकसंख्या आहे.

२०१७-२०१९ सालापासून धरणाच्या संरक्षक भिंतीच्या दुरवस्थेबाबत जिल्हा परिषदेकडे तक्रार करण्यात येत आहे. मात्र, त्यांच्याकडून जाणिवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

शेकापच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी उमटे धरणाच्या प्रश्नी सातत्याने आवाज उठवला आहे. त्या नेहमीच येथील नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या आहेत. त्यांच्याच पान २ वर

> उमटे धरणातील गाळ काढणे, सांडव्याची दुरुस्ती करण्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत ऑनलाईन बैठक नुकतीच पार पडली आहे. त्या बैठकीला खासदार, आमदार यांच्यासह अन्य लोकप्रतिनिधी उपस्थित होते. तातडीने अंदाजपत्रक तयार करण्याच्या सूचना अजित पवार यांनी लघुपाटबंधारे विभागाला दिल्या आहेत. धरणाची मालकी आमच्याकडे नाही, पाटबंधारे विभागाकडे आहे. आम्हाला धरणाचे पाणी वापरायला दिले आहे.
> – डॉ. भरत बास्टेवाड, मुख्यकार्यकारी अधिकारी

# पाण्यासाठी करंजाडेकरांचे आंदोलन

- सिडकोच्या गलथान कारभाराचा निषेध
- जेएनपीटी महामार्गावर केला रास्ता रोको



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

सिडकोच्या गलथान कारभारातुळे करंजाडेवासियांचा पाण्याचा प्रश्न अद्यापही निकाली न निघाल्याने त्याच्या विरोधात करंजाडे पिपल्स फाऊंडेशनच्या वतीने मोठ्या संख्येने येथील रहिवाशांनी रस्त्यावर उतरुन सिडकोचा निषेध केला. सामाजिक कार्यकर्ते विनोद साबळे, माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांच्यासह मोठ्या प्रमाणात नागरिक सकाळी जेएनपीटी हायवे रास्ता रोको करण्यासाठी रस्त्यावर उतरले होते व त्यांनी धडक मोर्चा काढून सिडकोच्या गलथान कारभाराचा पाढाच वाचला.

गेल्या अनेक महिन्यापासून या परिसरात पाणी प्रश्न बिकट होत चालला असून त्यामुळे अनेकांनी आपली राहते घरे विकून दुसरीकडे राहण्यास गेले आहेत. सिडकोने या भागाचा विकास करताना पाणी प्रश्नाचे नियोजन करणे गरजेचे होते. परंतु ते न करता येथे फक्त इमारती उभारल्या गेल्या आहेत, रहिवाशांना पाणी विकत घ्यावे लागत आहे. या सर्व गोष्टीचा येथील नागरिकांनी निषेध केला व सिडकोने त्वरित पाणी प्रश्न निकाली न काढल्यास आगामी अधिवेशनात करंजाडेवासियांचा मोर्चा त्यांच्याविरोधात काढण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते पान २ वर

# विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी १२ जुलैला मतदान


**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

गेल्या कित्येक दिवसांपासून विधानपरिषदेच्या ११ जागांसाठीच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. या निवडणुकीसाठी उमेदवारांची निवड प्रक्रियाही राजकीय पक्षांनी चालू केली होती. दरम्यान, निवडणूक आयोगाने महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी निवडणुकीची घोषणा केली आहे. त्याबाबतचे वेळापत्रकही निवडणूक आयोगाने जारी केले आहे.

निवडणूक कार्यक्रमानुसार विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी येत्या १२ जुलै रोजी मतदान होईल. त्याच दिवशी म्हणजेच १२ जुलै रोजी निकाल जाहीर केला जाईल. या निवडणुकीसाठी येत्या २५ जून रोजी निवडणूक आयोगाकडून अधिसचूना जारी केली जाईल. त्यानंतर उमेदवारांना २ जुलैपर्यंत आपला उमेदवारी अर्ज दाखल करता येईल. ३ जुलै रोजी अर्जांची छाननी केली जाईल. तर उमेदवारांना आपला उमेदवारी अर्ज ५ जुलैपर्यंत मागे घेता येईल. १२ जुलै रोजी या निवडणुकीसाठी प्रत्यक्ष मतदान होईल. सकाळी नऊ ते चार वाजेपर्यंत यासाठी मतदान करता येईल. १२ जुलै रोजीच मतमोजणी करून निकाल जाहीर केला जाणार आहे.

### आमदार होणार निवृत्त

विधानसभेच्या आमदारांनी मतदानाच्या माध्यमातून नियुक्त केलेले विधानपरिषदेच्या ११ आमदारांचा कार्यकाळ येत्या २७ जुलै रोजी संपणार आहे. त्यामुळे त्यांच्या जागेवर अन्य व्यक्तींची आमदार म्हणून निवड केली जाईल. २७ जुले रोजी कार्यकाळ संपणाऱ्या आमदारांमध्ये जयंत पाटील (शेतकरी कामगार पक्ष), विजय गिरकर, निलय नाईक, रमेश पाटील, रामराव पाटील (भाजप), महादेव जानकर (भाजप मित्र पक्ष), अनिल परब (शिवसेना ठाकरे गट), मनीषा कायंदे (शिवसेना शिंदे गट), डॉ. वजाहत मिर्झा व डॉ. प्रज्ञा सातव (काँग्रेस), बाबाजानी दुराणी (राष्ट्रवादी) या ११ आमदारांचा समावेश आहे.



### कोकण पदवीधर, शिक्षक मतदारांना २६ जून रोजी विशेष नैमित्तिक रजा मंजूर

**। रायगड । प्रतिनिधी ।**

कोकण विभागीय पदवीधर मतदार संघातील मतदारांना मतदानाचा हक्क बजावणेसाठी मतदानाच्या दिवशी २६ जून २०२४ रोजी पदवीधर, शिक्षक मतदारांना विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्यात आली आहे, अशी माहिती उपआयुक्त (सा.प्र.) कोकण विभाग तथा सह निवडणूक निर्णय अधिकारी अमोल यादव यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये दिली आहे. पान २ वर

### कर्मचाऱ्यांची तारेवरची कसरत

# जिल्हा कारागृहात क्षमतेपेक्षा ‘बंदी’

प्रमोद जाधव

**। अलिबाग ।**

अलिबागमधील जिल्हा कारागृह ८२ बंद्याच्या क्षमतेचे आहे. मात्र या कारागृहात दुपट्टीपेक्षा अधिक बंदी असल्याचे समोर आले आहे. क्षमतेपेक्षा अधिक बंदी कारागृहात असल्याने त्याचा ताण कार्यरत कर्मचाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात पडत आहे. बंद्यांना सांभाळताना कर्मचाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

अलिबागमधील जिल्हा कारागृह ऐतिहासिक वास्तू आहे. या वास्तूचा वापर वेगवेगळ्या गुन्ह्यातील बंदींना ठेवण्यासाठी केला जात आहे. आंग्रेकालीन असलेल्या ३५ फुट उंचीच्या या वास्तूला संपूर्ण दगडाने विळखा घातला आहे. त्याच्या आतमध्ये बंद्यांना ठेवले जाते.अलिबागमधील जिल्हा कारागृह ८२ बंद्याच्या क्षमतेचे आहे. त्यात ८० पुरुष व दोन महिला बंद्याचा समावेश आहे. मात्र जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारीमुळे बंद्याची संख्यादेखील दिवसेंदिवस वाढत आहे.

जिल्हा कारागृहात सध्या १७८ बंदी आहेत. त्यामध्ये १६६ पुरुष व १२ महिला बंद्याचा समावेश आहे. ज्या कारागृहात दोन महिला ठेवण्याची जागा आहे. त्याठिकाणी १२ महिला बंदी आहेत. त्यामुळे दहा बंदी कारागृहात अधिक असल्याचे पान २ वर



### २२ ते ४० वयोगटातील कैदी ८० टक्के

खून, चोरी या गुन्ह्यातील बंदी कारागृहात आहेत. खून, चोरीसारखे गुन्हे केलेले बंदी ८० टक्के आहेत. परंतु परराज्य, जिल्ह्यातील गुन्हेगारांचा यात अधिक समावेश आहे. रायगड जिल्हा शांत आहे. कारागृहात येणारे बंदी हे पर राज्यासह परजिल्ह्यातील अधिक आहेत. जिल्ह्यातील बंद्यांची संख्या कमी असल्याची माहिती समोर आली आहे.

> कारागृहात ३८ मंजूर पदांपैकी २७ पदे भरली आहेत. ११ पदे रिक्त आहेत. त्यामुळे काम करताना अडचणी येतात. तरीदेखील कर्मचारी योग्य पध्दतीने काम करीत आहेत. बंद्याच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवण्याचे काम येथे केले जाते.
> – रामचंद्र नरवरे वरिष्ठ तुरुंगाधिकारी जिल्हा कारागृह अलिबाग

# माथेरानमध्ये ‘वर्षारंभ’; पर्यटक चिंब



**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरानमध्ये मंगळवारी पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे माथेरान पर्यटनस्थळी दाखल झालेल्या पर्यटकांनी पावसात भिजण्याचा मनसोक्त आनंद लुटला. माथेरानमध्ये वर्षारंभ झाला आहे.

माथेरानमध्ये पावसाने जोरदार हजेरी लावली. तसेच पर्यटकदेखील भिजून चिंब झालेले रस्त्यावर दिसत होते. बालगोपाळांसह आबालवृद्धांनीदेखील भिजून चिंब होत पावसाचा मनसोक्त आनंद घेतला.

जून महिना अर्ध्यावर आला तरी पावसाने काही हजेरी लावली नव्हती. मात्र गेल्या काही दिवसांपासून सर्वत्र माथेरान परिसरात ढगाळ वातावरण होत होते. मंगळवारी सकाळ पासूनच वातावरणात बदल होऊन पावसाला सुरूवात झाली. मागील काही दिवसात टप्प्याटप्प्याने पान २ वर

> मुंबईत उकाड्याने हैराण झालो होतो म्हणून आम्ही संपूर्ण कुटुंब माथेरानला आलो. शनिवार आणि रविवार येथे जास्त गर्दी असल्याने आम्ही येथे मधल्या दिवसांत येणे पसंत केले.सकाळी आम्ही माथेरानमध्ये दाखल होताच पावसाने जोरदार हजेरी लावली. यामध्ये आम्ही सर्वांनी मनसोक्त, मनमुराद भिजण्याचा आनंद घेतला. माथेरानमधील वर्षा पर्यटनाला सुरवात झाली असून येथील हे वर्षा पर्यटन खूपच आल्हाददायक आणि येथील निसर्गसौंदर्य खूप मनमोहक आहे.
> – अनिल शिंदे, पर्यटक, मुंबई

# पाच्छापूर ते दर्यागाव रस्ता चिखलमय

## ■ अपूर्ण कामामुळे ग्रामस्थांची ससेहोलपट, शेकडो पर्यटक, ग्रामस्थांची वाहने रस्त्यात फसली



**। पाली /बेणसे दि. । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील पाच्छापूर ते दर्यागाव या रस्त्याची प्रचंड दुर्दशा झाली आहे. त्यातच पाऊस पडल्यामुळे चिखल व राडारोडा झाला आहे. यातून ग्रामस्थांना, पर्यटकांना जिकरीचा प्रवास करावा लागत आहे. या मार्गालगत सुधागड किल्ला असून गडावर पोहचण्यासाठी उपयुक्त मार्ग दुरवस्थेत असल्याने गडप्रेमी, दुर्ग प्रेमीदेखील नाराजी दर्शवत आहेत. या रस्त्याच्या अपूर्ण कामामुळे ग्रामस्थांची ससेहोलपट होत आहे.

त्यामुळे रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी ग्रामस्थांनी मंगळवारी (ता.१८) पाली तहसीलदारांना निवेदन दिले. तसेच येत्या चार दिवसात संबंधित अधिकाऱ्यांची बैठक लावली नाही तर ग्रामस्थ साखळी उपोषण व धरणे आंदोलन करणार आहेत. असा इशारादेखील निवेदनात देण्यात आला आहे.

या निवेदनात नमूद केले आहे की, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत पाच्छापूर ते दर्यागाव या रस्त्याचे काम मंजूर झाले आहे. या रस्त्याच्या कामाची सुरुवात फेब्रुवारीला करण्यात आली आहे. काम सुरू करताना वाहतुकीचा अडथळा नको म्हणून संबंधित प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या यंत्रणेने एसटी वाहतूक थांबवली. सदरचे काम हे मे २०२४ अखेर पूर्ण होणे गरजेचे होते. असे असूनही या रस्त्याचे काम धिम्या गतीने सुरू आहे. या रस्त्यावर खडीकरणाचा भराव करण्यात आला आहे. आता पावसाळा सुरू झाल्याने सगळीकडे चिखल साठला आहे. त्यामुळे रस्ता वाहतुकीस

### ■ रस्त्याचे काम जलद पूर्ण न झाल्यास ग्रामस्थ करणार आंदोलन

योग्य राहिलेला नाही. त्यातच एसटी वाहतूक बंद झाल्यामुळे शाळेच्या विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यायेण्यासाठी पायी प्रवास करावा लागत आहे. परिणामी त्यांचे शैक्षणिक नुकसानदेखील होत आहे. तसेच आबाला वृद्धांना औषधोपचाराकरिता पाली येथे येणे शक्य होत नाही. त्यामुळे दर्यागाव व पंचशील नगर ग्रामस्थांचे हाल होत आहेत. यासंबंधी ग्रामस्थ व ग्रामपंचायतीने अनेक वेळा संबंधित यंत्रणेच्या ज्युनियर इंजिनियर, डेप्युटी इंजिनिअर व मुख्य कार्यकारी अभियंता यांना वेळोवेळी संपर्क साधलेला होता. मात्र संबंधित शासकीय यंत्रणेने आजपर्यंत ग्रामस्थांची कोणतीही दखल घेतलेली नाही. त्यामुळे तहसीलदार सुधागड पाली यांनी येत्या चार दिवसात संबंधित यंत्रणेच्या मुख्य कार्यकारी अभियंता, डेप्युटी इंजिनियर या शासकीय अधिकाऱ्यांची बैठक तहसील कार्यालयाच्या दालनामध्ये बोलवण्यात यावी व संबंधितांकडून सदरच्या अडचणी बाबत ग्रामस्थ व अधिकाऱ्यांची चर्चा घडवून आणावी आणि योग्य तो मार्ग काढावा ही विनंती करण्यात आली आहे. अन्यथा दर्यागाव व पंचशील नगर ग्रामस्थ साखळी उपोषण व धरणे आंदोलन करणार आहेत. असे निवेदनात म्हटले आहे. तहसीलदार उत्तम कुंभार यांना निवेदन देतेवेळी राम शिद, रोशन बेलोसे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना अन्नधान्य किट, शैक्षणिक साहित्याचे वाटप



**। खांब । वार्ताहर ।**

रुपेन तन्ना मेमोरियल ट्रस्ट व कोकण कला व शिक्षण विकास संस्था मुंबई यांच्या वतीने रोहा तालुक्यातील श्रमिक विद्यालय चिल्हे व न्यू इंग्लिश स्कूल विठ्ठलवाडी-राजखलाटी विद्यालयातील सुमारे ४०० विद्यार्थ्यांना अन्नधान्य किट व शैक्षणिक साहित्याचे वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

रूपेन तन्ना मेमोरियल ट्रस्टच्या प्रमुख ॲड. उषा तन्ना यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे व अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले. यावेळी मधुमती रच्चा, रितवाज रच्चा, विजय, खुशबू शहा, असिता निरे, रचना वर्मा, रवी बलसारे, मुख्याध्यापक दिपक जगताप, नरेंद्र माळी, संदेश गायकवाड, विश्वनाथ जाधव, दिपक मोरे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

ॲड. उषा तन्ना यांचे दिवंगत सुपुत्र ॲड. रूपेन तन्ना यांच्या स्मृतींना उजाळा मिळावा यासाठी त्यांचे हे कार्य सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून गरजू विद्यार्थी व समाजातील गरजवंत व्यक्ती यांच्या सहयोगासाठी सुरू असल्याचे तसेच कोकण कला व शिक्षण विकास संस्था मुंबई या संस्थेचेही कार्य याप्रमाणेच सुरू असल्याची माहिती यावेळी आयोजकांकडून देण्यात आली आहे.

# रक्तदानासाठी महिलांचा पुढाकार

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील पनवेलमधील विविध सामाजिक संघटना गेली सहा वर्षे बकरी ईदनिमित्त रक्तदान शिबीर आयोजित करत आहेत. यावर्षीही रविवारी (दि. १६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, पनवेल येथे रक्तदान शिबीर घेण्यात आले. यामध्ये पन्नासहून अधिक लोकांनी सहभाग घेतला. महिलांचा सहभाग उत्स्फूर्त होता. या ठिकाणी सेल्फी पॉईंटदेखील ठेवण्यात आला होता.

महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती शाखा पनवेल, संविधान प्रचारक, अंजुमनफराजंदन- ई-तौहीद एज्युकेशन अँड वेल्फेअर ट्रस्ट, सर्वोदय, राष्ट्र सेवा दल, ग्रामस्वराज्य समिती महाराष्ट्र, ग्राममित्र, ग्रामसंवर्धन सामाजिक संस्था, कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन, युसुफ मेहेरअली सेंटर, तारा, मिशन माणुसकी अशा विविध संघटनांच्या सहभागातून हा उपक्रम पार पडला. रोटरी ब्लड बँक खांदा कॉलनीच्या सहकार्यातून हे शिबीर संपन्न झाले.



# पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

शाळेचा पहिला दिवस विद्यार्थ्यांच्या स्मरणात रहावा यासाठी, चिरनेर, आवरे, पिरकोन तसेच या भागातील अन्य शाळांमधून पहिल्या दिवशी विविध उपक्रम राबविण्यात आले. यावेळी प्रथम एज्युकेशन फाऊंडेशनच्या जयवंती गोंधळी यांनी या भागातील प्राथमिक शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या भागातील राजिपच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, गुणवत्ता तसेच शालेय स्पर्धा परीक्षा, मार्गदर्शन आणि सांस्कृतिक कार्यक्रम आदी उपक्रम वर्षभर शाळेत राबविले जात असल्याचे येथील शाळांच्या मुख्याध्यापकांकडून सांगण्यात आले.

देविदास म्हात्रे यांनी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना आपल्या आई-वडिलांच्या स्मरणार्थ वह्यांचे वाटप केले. यावेळी बबन पाटील, निर्भय म्हात्रे, देविदास म्हात्रे, प्रभाकर म्हात्रे, डी.ए. गावंड, जयवंती गोंधळी, ज्योती ठाकूर, अलका गावंड, माई म्हात्रे, सुवर्णा म्हात्रे, अरुणा पाटील, सीमा कोल्हे, गणेश गावंड, समर्थ गावंड, नरेश पाटील, प्रियांका पाटील, वर्षा गावंड, करिष्मा गावंड, मनीषा पाटील, पूनम पाटील, मानसी म्हात्रे, संहिता कोळी, ज्योती बामणकर आदी उपस्थित होते.

# वडगाव शाळेत अवतरली कार्टूननगरी

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा परिषद शाळा वडगाव येथे पहिलीच्या वर्गामध्ये दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे पायांचे व हाताचे ठसे एका कागदावर घेऊन नाविन्यपूर्ण उपक्रम मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी राबविला. तसेच नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानाने शाळेत आणण्यात आले.

त्यांच्या स्वागतासाठी छोटा भीम, डोनाल्ड, डक, चुटकी यांच्या वेषात त्यांचे स्वागत करण्यात आले. त्याचबरोबर प्रभात फेरी काढून फुग्यांवर लिहिलेली घोषवाक्ये, पालकांचे लक्ष वेधून घेतले जात होते. यावेळी हा परिसर मुलांच्या घोषवाक्यांनी गर्जून गेल्याचे पाहावयास मिळाले.

शाळेच्या पहिल्याच दिवशी मा. सरपंच गौरी गडगे, महादेव गडगे यांच्या माध्यमातून गोड खाऊचे वाटप करुन मुलांचा पहिला दिवस गोड करण्यात आला. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा करूणा ठोंबरे, सदस्य शिल्पा जाधव, पालक ग्रामस्थ यांच्यासह शिक्षक वैजनाथ जाधव, सरस्वती कवाद, स्वयंसेविका निकिता गडगे, साक्षी जांभुळकर उपस्थित होत्या.




# मुरूडच्या महात्मा फुले पतसंस्थेकडून वृक्षारोपण

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था ही सामाजिक बांधिलकी जपणारी एका विश्वसनीय पतसंस्था आहे. पतसंस्थेच्या सर्व सदस्य व संचालक मंडळाने मुरुडमधील नागरिकांच्या सहकार्याने 'झाडे घ्या व झाडे जगवा' या उपक्रमाच्या माध्यमातून वृक्षारोपण केले.

एक झाड वाढविण्यात एक वेगळं समाधान असते. तुम्हाला फक्त एक काम करायचे आहे. महात्मा फुले पतसंस्था आपणास एक मोफत रोपटे देत आहे, त्याला आपण लहान मुलासारखे वाढवून मोठे करा व या वसुंधरेचे रक्षण करुन खरे हिरो व्हा, असे आवाहन पतसंस्थेचे अध्यक्ष अजित गुरव यांनी केले. या वृक्ष जतन व संवर्धन मोहिमेला रविवारी दत्त देवस्थान मंदिरापासून सुरुवात झाली.

दत्तवाडी येथील 'दत्तवाडी मित्र परिवार' यांना रोपांचे वाटप करण्यात आले. या मित्र परिवाराने सकाळीच दत्त मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यास सुरुवात केली आहे.



विशेष म्हणजे, या दत्तवाडी मित्र परिवाराने दत्त मंदिर परिसरात अनेक झाडे लावून ती जगवली आहेत. स्वप्नील भगत, ऋतीक भायदे, अभिजित भायदे, दिपक दसम, मंगेश मोहिते, सिद्धेश देवगणे, ऋषिकेश मांदाडकर, अथर्व वाणी, दुर्गेश पाटील, साहिल वाळंज या दत्तवाडी मित्र परिवारातील सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

पान १ वरून

## 'सुरई'वर धनदांडग्याची वक्रदृष्टी

उत्सव साजरे केले जातात. त्यामुळे या परिसराला उत्सव व यात्रेचे स्वरुप येते. सुरई येथील श्रीदत्त मंदिर ट्रस्टच्या नावाने हे मंदिर व परिसर असल्याचे सांगण्यात आले आहे. या मंदिराच्या डोंगराच्या पायथ्याशी लागूनच शेकडो घरे आहेत. सुमारे १८ एकर जागेत ट्रस्टचा अधिकार असताना, शिंदे गटातील भारत मोती,जीवन परदेशी यांच्याकडून धनदांडग्यांना अभय दिले जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. मंदिराला लागूनच असलेल्या डोंगरावरील जागेमध्ये विकासाच्या नावाखाली, बेकायदेशीररित्या खोदकाम व बांधकाम यांच्या मदतीने केला जात असल्याचे सांगण्यात आले आहे. ही बाब ग्रामस्थांनी लेखी निवेदनाद्वारे महसूल विभागासह पोलीस प्रशासनाच्या निर्दशनास आणून दिली. पोकलन व अन्य अवजड वाहनांच्या वर्दळीमुळे डोंगराला भगदाड पडण्याची भिती आहे. मशीनद्वारे होणाऱ्या खोदाईमुळे डोंगराला हादरे बसत आहे. त्यामुळे संपूर्ण डोंगर कोसळून गावातील घरांचे नुकसान होण्याची शक्यता असून जीवितहानीचा प्रश्नदेखील गंभीर असल्याचे निवेदनातून सांगितले आहे. परंतु प्रशासनाने कोणतीही दखल न घेता उलट धनदांडग्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला आहे, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. राजकीय दबावाखाली महिलांविरोधात रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करून त्यांना गुन्ह्यात अडकविण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्रशासनाच्या या धोरणाबाबत ग्रामस्थांसह महिलांनी आक्रमक भूमिका घेत खोदकाम रोखले. याबाबत रेवदंडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरवले यांच्याशी संपर्क साधला, तो होऊ शकला नाही.

## भररस्त्यात प्रेयसीची हत्या

संतप्त झाला होता. आरती वसईच्या एका कंपनीत कामाला लागली होती. मंगळवारी सकाळी साडेआठच्या सुमारास ती नेहमीप्रमाणे कामावर जाण्यासाठी निघाली होती. मात्र गावराई पाडा येथील स्टेट बँकेत समोर रोहितने तिला अडवले. दोघांची शाब्दिक बाचाबाची झाली. त्यावेळी रोहित ने आपल्या सोबत आणलेल्या लोखंडी पान्याने तिच्यावर सपासप वार केले. आरती खाली कोसळली. काही वेळाने रोहित पुन्हा आला आणि त्याने तिच्यावर वार केले त्यात ती गतप्राण झाली. हत्येनंतर आरोपी रोहित तिथेच बसून राहिला वालीव पोलिसांनी घटनास्थळावरून आरोपी रोहितला ताब्यात घेतले. मयत आरतीचे बारावीपर्यंत शिक्षण झाले असून एक महिन्यापूर्वीच ती कंपनीत कामाला लागली होती.सकाळची वेळ असल्याने रस्त्यामध्ये प्रचंड गर्दी होती. आरोपी यादव आरतीवर वार करत असताना लोकं व्हिडिओ काढण्यामध्ये मग्न होते. कोणीही तिला वाचवायला पुढे आले नाही. एक तरुण फक्त आरोपीला अडवायला पुढे होता. मात्र त्याचा प्रयत्न निष्फळ ठरला. लोकं पुढे आली असती तर आरतीचे प्राण वाचले असते, असे पोलिसांनी सांगितले.

## लक्ष्मण हाकेंची प्रकृती बिघडली

घेणे बंद केले आहे. त्यामुळे, उपोषणकर्ते लक्ष्मण हाके यांची प्रकृती बिघडली असून आज डॉक्टरांनी त्यांची तपासणी केली. ओबीसी समजाच्या न्याय व हक्कासाठी आपलं उपोषण आहे, असे म्हणत लक्ष्मण हाके यांनी ५ दिवसांपासून उपोषणाला सुरुवात केली आहे. त्यातच, गेल्या २ दिवसांपासून पाणी पिणेही बंद केले आहेत. त्यामुळे, त्यांची प्रकृती बिघडत चालली असून अशक्तपणाही आला आहे. लक्ष्मण हाके यांच्या शरीरातील शुगर आणि पाणीपातळी खालावली, चक्कर येत असल्याने डॉक्टरांच्या पथकाकडून त्यांना उपचाराचा आग्रह करण्यात आला. मात्र, हाके यांच्याकडून उपचार घेण्यास नकार देण्यात आला आहे. तर, डॉक्टरांनी सलाईन लावण्याची विनंती केली, पण सलाईन घेण्यासही त्यांनी नकार देत आपलं प्राणांतिक उपोषण सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले.

## कार दरीत कोसळून तरुणीचा मृत्यू

संभाजीनगर शहरापासून ४० किमी लांब डोंगरावर नेले. येथे सूरजने श्वेताला कार चालविता येत नाही हे माहिती असूनही कार चालविण्यास दिली. यानंतर रिव्हर्स गिअरमध्ये कार मागे जात दरीत कोसळून श्वेताचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला. श्वेताच्या मृत्यूला सूरज हाच कारणीभूत व जबाबदार आहे. या फिर्यादीवरून खुलताबाद पोलीसांनी गुन्हा दाखल करून सूरज मुळे यास अटक केली आहे.

## उमटे धरणाच्या मालकांनी तोंड लपवले

पुढाकारातून धरणाचा गाळ काढण्यात आला हे विसरता येणार नाही.

दैनिक कृषीवलने धरणाची सध्यस्थिती उघड केली. त्यामध्ये धरणाचे भयाण वास्तव समोर आले आहे. धरणाची भिंत फुटली, तर फार मोठे संकट धरण परिसरातील नागरिकांवर येऊ शकते. कृषीवलने दिलेल्या वृत्ताची दखल अलिबाग तहसिलदार विक्रम पाटील यांनी घेतली. त्यांनी मंगळवारी तातडीने मंडळ अधिकारी राम मांढरे, रामराज तलाठी प्रदीप थोरात, बोरघर तलाठी सर्फराज सुभेदार, कोतवाल मोहन लोभी यांना पंचनामा करण्यासाठी धाडले होते. महसूल यंत्रणेने पंचनामा केला असून धरणाच्या भिंतीला चार-पाच ठिकाणी भगदाड पडले आहे. त्यामुळे धोका उद्‌भवण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे मंडळ अधिकारी राम मांढरे यांनी कृषीवलशी बोलताना सांगितले. याबाबतचा अहवाल अलिबाग तहसीलदार पाटील यांना देण्यात येणार असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले.महसूल यंत्रणेने धरणाबाबत तातडीने दखल घेतली मात्र, रायगड जिल्हा परिषदेच्या मालकीचे हे धरण आहे. तेथील प्रशासनातील एकही अधिकारी अथवा कर्मचारी फिरकलाच नाही. त्यामुळे स्थानिकांनी नाराजी व्यक्त केली. जिल्हा परिषदेला आमच्या जगण्या-मरणाबाबत काही देणे-घेणे नाही, असेच दिसून येते. त्यांना आमची फिकीर असती,तर आतापर्यंत केलेल्या तक्रारींची दखल घेऊन धरणाची डागडुजी केली असती, असे उमटे धरण संघर्ष ग्रुपचे ॲड. राकेश पाटील यांनी कृषीवलला सांगितले.अलिबागचे तहसीलदार विक्रम पाटील यांचे खरोखरच आभार, त्यांनी परिस्थितीचे गांभिर्य पाहून आपल्या अधिकऱ्यांना प्रत्यक्ष धरणावर जाऊन धरणाची पाहाणी करण्याचे आदेश दिले. परंतु ज्यांच्या अधिकार क्षेत्रात उमटे धरण आहे ते अजगराच्या झोपेचे सोंग घेतलेले ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी अजूनपर्यंत पोहचलेले नाहीत हा निर्लज्जपणाचा कळस आहे. त्यांची खाते निहाय चौकशी करुन त्यांचे निलंबन करावे, अशी मागणीही ॲड. राकेश पाटील यांनी केली.

## पाण्यासाठी करंजाडेकरांचे आंदोलन

विनोद साबळे यांनी दिला आहे.गेल्या काही वर्षांपासून करंजाडे वसाहतीला पाणीटंचाईचे ग्रहण लागले आहे. पाण्यापासून नागरिकांचे हाल सुरू आहेत. पाणी पुरवठा सुरळीत न केल्यास जन आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. त्यानुसार करंजाडे वसाहतीच्या पाठीमागील बाजूस असलेल्या जेएनपीटी रोडवर रास्ता रोको आंदोलन करण्याचे ठरले. मात्र पोलिसांनी सेक्टर ६ ते करंजाडे पोलीस चौकीपर्यंतच हा रास्ता रोको अडवला. करंजाडे वसाहत सिडकोने वसवली आहे. मात्र मूलभूत सुविधा पुरवण्यात सिडको अपयशी ठरलेली दिसून येत आहे. पुरेसे पाणी मिळत नसल्याने येथील रहिवासी हैराण झाले आहेत. पाण्याअभावी नागरिकांचे हाल सुरू आहेत. पाणीटंचाईमुळे करंजाडेकर त्रस्त झाले आहेत कोणत्याही परिस्थितीत पाणी मिळाल्याशिवाय शांत बसायचे नाही असा निर्धार नागरिकांनी केला होता. यासाठी सिडकोला विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले होते. पुकारण्यात आलेल्या आंदोलनात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. पाणी आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे या घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता. यावेळी सिडकोचे कनिष्ठ अधिकारी आंदोलनकर्त्यांना भेटण्यासाठी आले मात्र वरिष्ठ अधिकारी आल्याशिवाय आम्ही जाणार नाही अशी ठाम भूमिका आंदोलन करताना घेतली त्यामुळे कार्यकारी अभियंता प्रणित मूल यांना त्या ठिकाणी यावे लागले आणि आंदोलनकर्त्यांच्या मागण्या समजावून घ्याव्या लागल्या.

एमजेपीची जुनी जीर्ण झालेली जलवाहिनी बंद करून जेएनपीटी हायवेलगत तयार करण्यात आलेली नवी जलवाहिनीद्वारे करंजाडे शहरासाठी २० एमएलडी पाणीपुरवठा करण्यात यावे. सेक्टर- ५/६ हिलसाईड सोसायट्यांचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी सेक्टर-६ मध्ये स्वतंत्र एमबीआर (पाण्याची टाकी) बांधण्यात यावे. शटडाऊनच्या काळात शहरातील सोसायट्यांना सिडको प्रशासनाकडून पाणीपुरवठा करण्यात यावा. करंजाडे शहराला हेटवणे धरणाचे पाणी आरक्षित करून करंजाडे पाणी प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावावे. शटडाऊन काळात आगाऊ पाण्याची व्यवस्था करण्यात यावी व शटडाऊन नंतर सोसायट्यांना गढूळ पाणीपुरवठा केला जातो याची काळजी घ्यावी. करंजाडे पाणीप्रश्न पूर्णतः मार्गी लागेपर्यंत नव्या इमारतींना सीसी व ओसीची मान्यता बंद करण्यात यावी. करंजाडे पाणी समस्येवर स्वतंत्र हेल्पलाईन सुरू करण्यात यावी. करंजाडे पाणीपुरवठा अधिकारी राहुल सरोदे यांच्याविरोधात रहिवाशांच्या अनेक तक्रारी आहेत, त्यांच्या जागी नवीन अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी. या मागण्या येथील रहिवाशांमार्फत करण्यात आल्या होत्या.

## २६ जून रोजी विशेष नैमित्तिक रजा मंजूर

भारत निवडणूक आयोगाने २४ मे २०२४ च्या प्रसिध्दी पत्रकानुसार महाराष्ट्र विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर व मुंबई शिक्षक मतदारसंघाचा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला होता. या घोषित कार्यक्रमानुसार कोकण विभाग पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीचे मतदान बुधवार २६ जून २०२४ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत या वेळेत होणार असून, मतमोजणी १ जुलै २०२४ रोजी होणार आहे. विधान परिषद शिक्षक, पदवीधर मतदारसंघाकरिता मर्यादित स्वरुपात मतदार असल्याने त्यांना मतदानाचा हक्क बजावता यावा. यासाठी पदवीधर, शिक्षक निवडणुकीमध्ये मतदार असलेल्या व्यक्तीला विशेष नैमित्तिक रजा जाहीर करण्यात आली आहे. सदरची रजा ही त्यांच्या अनुज्ञेय असलेल्या नैमित्तिक रजे व्यतिरिक्त असणार आहे. जाहीर करण्यात आलेल्या नैमित्तिक रजेचा लाभ घेऊन पदवीधर, शिक्षक मतदारांनी मोठ्या संख्येने मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन उपआयुक्त (सा.प्र.)कोकण विभाग तथा सह निवडणूक निर्णय अधिकारी अमोल यादव यांनी केले आहे.

## माथेरानमध्ये 'वर्षारंभ' ; पर्यटक चिंब

हलक्या ते मध्यम सरी बरसत होत्या. अधूनमधून पावसाने उघडीपसुद्धा दिली. वातावरणात चांगलाच बदल होऊन अधिक गारवा निर्माण झाला. माथेरान पर्यटनस्थळी येणारा पर्यटक हा पावसाळ्यातील गारवा अनुभवण्यासाठी अधिक प्रमाणात येत असतो.जून महिन्याच्या मध्यावर माथेरान पर्यटनस्थळी दाखल झालेल्या पर्यटकांनी येथे निसर्गाचा मनमुराद आनंद घेत येथील थंड आल्हाददायक वातावरणात व बरसणाऱ्या पावसात चिंब भिजण्याचा आनंद लुटत घोड्यावरून रपेटदेखील केली. पावसाला चांगलीच सुरवात झाली असून ढगांच्या गडगडाटासह पावसाने जोरदार हजेरी लावली. आता यापुढे माथेरान पर्यटनस्थळी वर्षा पर्यटनाला सुरूवात होणार आहे. वर्षा पर्यटनासाठी माथेरान हे एक उत्तम पर्यटनस्थळ असून या निसर्गरम्य पर्यटनस्थळाला पर्यटक अधिक पसंती देताना दिसणार आहेत.

## जिल्हा कारागृहात क्षमतेपेक्षा बंदी

समोर आले आहे. कारागृहात पुरुष ८० बंदीना मान्यता असताना १६६ बंद्यांना ठेवावे लागत आहे. त्यामुळे ८६ बंदी अधिक या कारागृहात आहेत.

जिल्हा कारागृहात ३८ मंजूर पदापैकी २७ कार्यरत आहेत. त्यात अधीक्षक, वरिष्ठ तुरुंगाधिकारी, तुरुंगाधिकारी, सुभेदार, हवालदार यांचा समावेश आहे. नऊ शिपाईपासून वैद्यकीय अधिकारी, परिचारिकासह ११ पदे रिक्त आहेत. कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याचा फटका कर्मचाऱ्यांना बसत आहे.

कर्मचारी कमी आणि बंदी अधिक अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे या कैद्यांवर नजर ठेवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. मागील काही वर्षापूर्वी या कारागृहातून तुरुंगाधिकारी व अन्य कर्मचाऱ्यांना चकवा देत चार बंदी पळून गेले होते. शासनाने रिक्त पदे तातडीने भरल्यास कर्मचाऱ्यांचा ताण कमी होईल या बंद्यावर लक्ष ठेवण्यास कर्मचाऱ्यांची मदत होणार आहे. त्यामुळे सरकारने याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालक १. सौ. लता विश्वास म्हात्रे, २. श्री केदार विश्वास म्हात्रे, ३. श्री. सुमित विश्वास म्हात्रे, ४. श्री. प्रथम विश्वास म्हात्रे सर्व रा. कामोठे, शरद मंदिराजवळ, कामोठे गांव, ता. पनवेल, जि. रायगड यांचेकडून कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे बलीवरे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| १६ | २/ब/३ | ८-२४-०० | १=१० |

पैकी विकी केलेले क्षेत्र ०.२०.९६ (हे. आर. पॉ.)

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि.१९/६/२०२४

**ॲड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस, एलएल. बी
प्रभात अपार्टमेंट, रूम नं. ४, दुसरा मजला,
सुनिल चिक्कीजवळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. नं. ९९६०८३८१६४/९०२८५०८४९६



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-08/24-25 /7000031298 | Providing 21 No of Skilled labour (ITI certified Technicians in Electrical / Wireman trade) for field work under 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane for F.Y. 2024-25..2nd call | Rs 48,64,768.58/- | 25.06.2024 up to 16:00 hrs |
| 2 | e-Tender-09/24-25 /7000031301 | Work of Providing 2 no of skilled labour (LDC cum computer operator) & 2 no unskilled labour (peon) at 400kV R.S. (O&M) Dn., Nagothane for 2024-25 …. 2nd call | Rs 8,66,241.11/- | 25.06.2024 up to 16:00 hrs |

EMD fee 1% of estimate amount & Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: MITESH GOYAL Mob No. 9461456635 Email ID: ee7230@mahatransco.in Note: All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane

**निवडक**

## राजेंद्र पाटील यांचा सत्कार

**उरण :** काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश जनरल सेक्रेटरी अंबरीन एम इस्माइल मुक्री व शेतकरी कामगार पक्ष उरण तालुका अध्यक्षा सीमा घरत यांनी उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते (पाटील) यांची भेट घेउन महिलांच्या विविध समस्या व त्यावर उपाययोजना याबाबत चर्चा केली. यावेळी नव्यानेच पदभार स्विकारल्याने राजेंद्र पाटील यांचा अंबरीन मुक्री आणि सीमा घरत यांनी गुलाब पुष्प देऊन स्वागत केले.

## कामोठ्यात डिझेलची चोरी

**पनवेल :** सोनु कुमार हा त्याच्या ताब्यातील सिमेंट मिक्सर घेऊन जात असताना कामोठे टोल नाक्याजवळ आल्यावर प्रांतविधी करण्यासाठी सिमेंट मिक्सर बाजूला लाऊन गेला. दरम्यानच्या काळात एक काळ्या रंगाच्या गाडीतून तीन अज्ञात व्यक्ती आले व त्यांनी डिझेलच्या टाकीचे लॉक तोडून त्यांच्याकडे असलेल्या साहित्याने डिझेलची चोरी करून ते पसार झाले. याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**चिरनेर :** उरण तालुक्यातील शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सूळ नारनवर यांनी केले आहे. रायगड जिल्ह्यात खरीप पिकांचे नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण व्हावे यासाठी चोला एमएस इन्शुरन्स कंपनी महाराष्ट्र राज्य शासनाद्वारे प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. खरीप पिकांचे नैसर्गिक आपत्ती पासून संरक्षण करण्यासाठी पिक विमा काढण्याची अंतिम तारीख १५ जुलै असल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले आहे.

## टाटा सुपरचा अपघात

**महाड :** टाटा सुपर कॅरी (एमएच-१२-आरएन-५३००) या गाडीत पाण्याची टाकी व दोन फिरते बाथरुम तसेच काही व्यक्तींना बसवून पाचाडकडे जात असताना चालकाला रस्ता वळणाचा असल्याचे माहीती असून ही रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन एका वळणावर गाडीवरचा ताबा सुटला. यामुळे गाडी पळटी होऊन गाडीत बसलेल्या व्यक्तीला गंभीर दुखापती झाल्या. याबाबत महाड तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आंबेनळी घाटात अपघात

**पोलादपूरः** महाबळेश्वर महामार्गावरी आंबेनळी घाटातील वळणावर स्वीप्ट कार (एमएच-१२-एचएन-५२७४) चालक जात असताना रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करत गाडी अतिवेगात चालवून समोरून येणाऱ्या एसटी (एमएच-१४-बीटी-२७४०) ला धडक दिली. या धडकेत कारचालक व गाडीतील व्यक्ती जखमी झाले असून दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे. याबाबत पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार बामणे हे करीत आहेत.

# महामार्गाचे स्वप्न अपूर्णच

### १४ वर्षानंतरही कामाची गती मंद

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम गेली १४ वर्ष रखडले असून सद्यस्थितीत या महामार्गाच्या कामाची रखडपट्टी अद्यापही सुरू असुन हे काम कधी पूर्ण होणार, हा एक प्रश्नच आहे. रखडलेल्या महामार्गाच्या कामाची अत्यंत गंभीर अवस्था झाली असून या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम आजही अपूर्णच राहिले आहे.



राज्यातील महत्वाचा विदर्भातील समृद्धी महामार्गाचे काम जलदगतीने पूर्ण झाले. मात्र, कोकणच्या विकासाचा मुंबई-गोवा महामार्ग वर्षोनुवर्षे रखडला असल्याने कोकणवासीयांचे दुखणे कायम राहिले आहे. सरकारने अनेक वेळा महामार्गाचे काम पूर्ण करण्याची आश्वासने दिली होती. त्यामुळे आजही कोकणच्या समृद्धीचा मार्ग खडतरच राहिला. या मार्गावरील इंदापूर व माणगाव बायपास कामाचा ठेकेदार बदलला तरी कामाला गती नाही. तसेच लोणेरे, टेमपाले, लाखपाले दरम्यान रस्त्याचे काम ठीकठिकाणी अपूर्ण असल्याने प्रवाशांची नाराजी पसरली आहे.


मुंबई - गोवा महामार्गावर सातत्याने होणारे लहान-मोठे अपघात तसेच या अपघातांतून अनेकांचे जाणारे जीव व अनेकांना आलेले कायमचे अपंगत्व पाहता हा महामार्ग जणू काही मृत्यूचा सापळाच बनला होता. गेल्या १४ वर्षांपूर्वी पळस्पे ते इंदापूर या जवळपास ९० किलोमीटर अंतराच्या पहिल्या टप्प्याचे चौपदरीकरणाचे काम सुरु करण्यात आले. त्यानंतर इंदापूरपासून पुढे दुसऱ्या टप्प्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. या महामार्गाचे काम गेली १४ वर्ष रखडले असुन पळस्पे ते इंदापूर या पहिल्या टप्प्याचे कामही अजून व्यवस्थित पूर्ण झालेले नाही. इंदापूरपासून पुढे असणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातील माणगावचा बायपासचा प्रश्नही खितपत पडला आहे. बायपासच्या कामाची रखडपट्टी यामुळे माणगाव शहरात सातत्याने वाहनांच्या १० किमीपर्यंत रांगा लागून वाहतूक कोंडी होत असते. माणगाव शहरात वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे बाजारपेठेतून बाहेर पडताना त्यांच्या नाकी दम येत आहे. मुंबई-गोवा महामार्गानंतर समृद्धी महामार्गाच्या कामाला सुरुवात होऊन तो महामार्ग पूर्ण होऊन सुरु ही झाला आहे. मग १४ वर्ष उलटूनही मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम अजून पूर्ण का होत नाही, असा सवाल जनतेतून होत आहे.

> माणगाव व इंदापूर येथील बायपास कामातील वन व रेल्वे विभागाकडील मंजुरीच्या अडचणी दूर झाल्या आहेत. या कामाचा पहिला ठेकेदार बदलला असून दुसऱ्या ठेकेदारांकडून हे काम करून घेतले जात आहे. लोणेरे ते टेमपाले, लाखपाले दरम्यान रस्त्याचे काम सुरु आहे. त्याचबरोबर इतर कामेही लवकर पूर्ण केली जाणार आहेत.
> – आकांक्षा मेश्राम, मुंबई–गोवा महामार्ग सहाय्यक अभियंता

# शासकीय कार्यालयातील शौचालयाची दुरवस्था

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तहसील कार्यालय जवळील शौचालयाची भयानक दुरवस्था झाली आहे. त्यामुळे शासकीय अधिकारी तसेच कार्यालयात ये-जा करणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यात सर्वत्र दुर्गंधी पसरत असल्याने पावसाळ्यात रोगराई पसरण्याचा संभव असल्याची भिती चक्क शासकीय अधिकारी वर्गच व्यक्त करत आहेत. तरी या शौचालयाची स्वच्छता व दुरुस्तीचे काम लवकरात लवकर करण्यात यावेत, अशी मागणी नागरीक व्यक्त करत आहेत.



उरण तहसील, पोलीस ठाणे व संबंधित शासकीय कार्यालयात कर्मचारी तसेच ये-जा करणाऱ्या नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी शासकीय निधीतून तहसील कार्यालयाजवळ सुसज्ज पुरुष व महिलांसाठी शौचालयाची उभारणी करण्यात आली होती. मागील वर्षभरापासून या स्वच्छता गृहांच्या स्वच्छतेकडे तहसील व पोलीस वर्गाने तसेच उरण नगर पालिकेकडून दुर्लक्ष होत आहे. यामुळे सध्या या शौचालयांची स्थिती अत्यंत खराब झाली आहे. पाण्याची व्यवस्था नसल्याने दुर्गंधी पसरली असून शौचालयाचा वापर करणे कठीण झाल्याने अनेक नागरिकांना नाहिलाजाने उघड्यावर शौचाला जावे लागत आहे. मात्र, महिलांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. तरी उरण तहसील व पोलीस ठाण्याचे अधिकारी तसेच उरण नगर पालिकेने शौचालयांची स्वच्छता व दुरुस्तीचे काम करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी सर्व सामान्य नागरिक व्यक्त करीत आहेत.

# बेकायदा बांधकामांचा सपाटा

### महसूल विभागाचे दुर्लक्ष

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील किनारपट्टीच्या भागात बेकायदा बांधकामे सुरू असून सीआरझेड कायद्याचे सर्रास उल्लंघन होत आहे. येथील धनदांडग्यांचे महसूल विभागाशी साटेलोटे असल्याने बांधकामांचा सपाटा सुरू असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

तालुक्यातील समुद्रकिनारी सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करीत अनधिकृत बांधकाम अनेक धनदांडग्यांकडून सुरू आहे. गुरचरण जागा ग्रामपंचायती अखत्यारीत असते. परंतु, त्या ठिकाणच्या स्थानिक सदस्यांना किंवा नेत्यांना हाताशी धरून काही मोठ्या शहरातील धनदांडग्यांनी आपल्या मर्जीप्रमाणे समुद्रकिनाऱ्यावरील गुरचरण जागेमध्ये बांधकाम केल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. या ठिकाणी आरसीसी प्रकारचे पक्के बांधकाम करत असल्याचे दिसत आहे. याबाबत बांधकाम करणाऱ्यांना महसूल विभागाची कोणतीही भीती राहिलेली नाही. कारण, त्या त्या ठिकाणचे स्थानिक तलाठी व मंडळ अधिकारी यांनी आपल्या फायद्यासाठी या बांधकामांना अभय दिल्याचे आरोप नागरिकांकडून होत आहे.

## व्यक्तीवर जीवघेणा हल्ला

**पाली :** वाघोशी गावाकडे जाणाऱ्या पायवाटेवरील एका आंब्याच्या झाडाजवळ ५० वर्षीय व्यक्तीच्या डोक्यात तसेच पुर्ण शरीरावर कोणत्या तरी कारणावरून अचानकपणे आरोपी व्यक्तीने लोखंडी पहारीने हल्ला केला. या हल्ल्यात ५० वर्षीय व्यक्तीला गंभीर स्वरूपाच्या दुखापती झाल्या. अलिबाग येथील सिव्हील हॉस्पीटलमध्ये उपचारासाठी दाखल केले असता उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. याबाबत पाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून संबंधीत आरोपीला अटक करण्यात आली आहे. अधिक तपास सपोनि गोरक्षनाथ बालवडकर हे करीत आहेत.



## ग्रामपंचायतीतर्फे डस्टबिनचे वाटप

**। कोर्लई । वार्ताहर ।**

ग्राम स्वच्छता अभियानात ‘स्वच्छगावसुंदरगाव’ कार्यक्रमांतर्गत अलिबाग तालुक्यातील खानाव ग्रामपंचायतीतर्फे सरपंच अजय नाईक व उपसरपंच निलेश गायकर यांच्या हस्ते नुकतेच मोफत डस्टबिनचे वाटप करण्यात आले. यावेळी खानाव गृप ग्रामपंचायती तर्फे परीसरातील ९ महसुली गावे व ४ वाड्यांना घरपट्टीप्रमाणे मोफत २ डस्टबिन असे एकूण ३००० डस्टबिन वाटप करण्यात आले.

यावेळी सरपंच अजय नाईक, निलेश गायकर, संदेश पडवळ, निधी नयन पाटील, विजय गायकर, योगेश गुजर, संदेश शिंदे, महेंद्र म्हात्रे, सतीश म्हात्रे, गजानन पाटील, प्रमोद, नितीन पाटील व ग्रामस्थ उपस्थित होते.

## कृषी संजीवनी पंधरवड्याचे आयोजन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र शासन कृषी विभाग, तालुका कृषी अधिकारी कार्यालय माणगाव यांच्यामार्फत कृषी संजीवनी पंधरवडाचे आयोजन दि. १७ जून ते ०१ जुलै या दरम्यान करण्यात आले आहे. यावेळी तालुका कृषी अधिकारी अजय वगरे यांनी माहिती देताना सांगितले की, या कृषी संजीवनी पंधरवड्या अंतर्गत तालुक्यामध्ये प्रत्येक दिवशी गावागावांमध्ये कृषीविषयक कार्यक्रम राबविले जातात आहेत. यामध्ये प्रत्येक दिवशी विविध विषयांवर मार्गदर्शन व मोहीम राबवली जाणार आहे. त्यामध्ये बीज प्रक्रिया, पी.एम. किसान दिन, जमीन सुपीकता जागृती दीन, गुणवत्तापूर्वक निविष्ठा यांची ओळख इत्यादी बाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

## बिल्डरांविरोधात तक्रारीत वाढ

**। उरण । वार्ताहर ।**

महारेराची स्थापना झाल्यापासून बिल्डरांविरोधात रायगड जिल्ह्यातून अनेक तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यामध्ये उरण, पनवेल, अलिबाग व पेण तालुक्यांचा समावेश आहे.

बिल्डर तथा विकसकांच्या विरोधात रायगडमधूनही मोठ्या प्रमाणावर तक्रारी असल्याचे महारेराकडील नोंदीवरून स्पष्ट होते. गृहनिर्माण क्षेत्राला शिस्त लागावी, गृहनिर्माण प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावेत, ग्राहकांची रखडपट्टी होऊ नये, या उद्देशाने २०१६ साली महारेराची स्थापना करण्यात आली असून, महारेराला प्रसंगी बिल्डरांवर कारवाई करण्याचे कायदेशीर अधिकार देण्यात आले आहेत.

प्रकल्प वेळेत पूर्ण न झाल्यास ग्राहक विकासकाच्या विरोधात महारेराकडे तक्रार करू शकतो. त्यावर रीतसर सुनावणी होते. महारेरा विकसकाला मुदतवाढ देऊ शकते किंवा आर्थिक दंड ठोठावू शकते. अनेक प्रकरणांत महारेराने विकसकाला दंड ठोठावल्याचीही उदाहरणे आहेत. यात उरण तालुक्यातील द्रोणागिरी नोड व शहरात उभ्या राहणाऱ्या बिल्डरांचाही समावेश आहे. काही बिल्डरांनी खोटी कागदपत्रे सादर करून महारेरा नंबर घेतला तर काहींनी महारेरा नंबर न घेताच इमारतींचे काम सुरू केले असल्याचे उघड होत आहे. महारेरा उरणमधील अशा बिल्डरांविरोधात काय कारवाई करते याकडे उरणकरांचे लक्ष लागून राहिले आहे.



● मुरुड परिसरात एक दिवस पाऊस पडला. शेतकरी कामाला लागला पण ८ दिवस झाले पाऊस पडलाच नाही. यामुळे येथील शेतकरी चिंतेत आहे. (छाया : सुधीर नाझरे)

## मुरूड तालुका पुन्हा तापला

**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**

**मोसमी पावसाची हुलकावणी**

१८ जूनचा दिवस उजाडला तरी मुरूड तालुक्यात मोसमी पावसाचे आगमन झालेले नसल्याने बळीराजा चिंताग्रस्त दिसून येत आहे. १० जून रोजी अचानक पूर्व मोसमी विजेच्या गडगडाटासह कोसळला होता. त्या दिवशी रात्री तीन तासात १५४ मिमी पाऊस पडल्याने तारांबळ उडाली होती. वीज पुरवठा १५ तास खंडित झाला होता. हवेत काहीसा थंडावा आला होता. पाऊस पडल्याने शेतकऱ्यांनी भात पेरणी करून घेतली. त्यानंतर पावसाने सतत हुलकावणी दिल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. परंतु, गेल्या आठ दिवसात मोसमी पाऊस अद्याप सुरू झाला नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. पाऊस नसल्याने मुरूड तालुका पुन्हा तापला आहे. तापमान ३१ ते ३२ पर्यंत गेले असून घामाच्या धारा कपाळावरुन वाहत आहेत. मेघगर्जनेसह पाऊस पडणार असे मेसेज हवामान खात्याकडून येत असले तरी गेल्या ८ दिवसात पावसाचा पत्ता नाही. भात पेरणी केलेल्या पिकासाठी पावसाची गरज आहे. त्यामुळे शेतकरी बांधव पावसाकडे डोळे लावून बसले आहेत.

## गणेश मूर्त्या बनविण्यास प्रारंभ

**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**

श्री गणेश चतुर्थी ७ सप्टेंबर रोजी येत असल्याने प्रतिवर्षाच्या गणेशोत्सव सणाला अद्याप तीन महिन्यांचा कालावधी असून मुरुड तालुक्यातील बहुतांशी गावातील गणेश मूर्तीकारांसह नांदगावमधील काही मूर्ती कारागिरांनी मूर्त्या बनविण्याच्या कामाला सुरुवात केली आहे.

विनायक चतुर्थीचा म्हणजेच १० जूनचा मुहूर्त साधून नांदगावमधील मूर्तीकार सतीश जोशी यांनी शाडूच्या मातीचे पूजन करून मूर्त्या बनविण्यास प्रारंभ केला आहे. सद्या येथे मोसमी पावसाला सुरुवात झाली असली तरी काही दिवसातच त्याने ओढ दिल्याने येथे कडक उन पडत आहे त्याचा फायदा उठवित तयार मूर्त्या वाळविण्यासाठी त्याचा उपयोग होत आहे. नंतरच्या काळातील कामाची घीसडघाई टाळण्यासाठी लवकरच सुरूवात केल्यास पुढे त्याचा फायदा होत असल्याचे मूर्तीकार जोशी यांनी सांगितले .



तसेच, यावर्षी देखील शाडूच्या मातीच्या दरात वाढ झाली आहे. शिवाय रंग साहीत्याच्या दरातही वाढ झाली आहे. येथील बहुतांशी मूर्तीकार प्लॅस्टर ऑफ पॅरिस पासून बनवलेल्या तयार मूर्त्या पेण तालुक्यातून आणतात. केवळ रंगकाम करुन त्यांची विक्री करतात. यावर्षी त्यांच्या कच्च्या मूर्त्यांच्या किमतीतही वाढ झाली असल्याने गणेश मूर्त्यांच्या किंमतीत वाढ होणार असल्याचे स्थानिक कलाकार बोलत आहेत.

# वडाळे तलावाच्या जैवविविधतेचे सर्वेक्षण

**। पनवेल ग्रामीण । वार्ताहर ।**

पनवेलकरांच्या आकर्षणाचे केंद्राबिंदू असलेल्या वडाळे तलावतील जैवविविधतेच सर्वेक्षण करण्याचा निर्णय काही निसर्ग प्रेमींनी घेतला आहे. पुढील वर्षभर महिन्यातून दोन दिवस हे सर्वेक्षण केले जाणार आहे. पनवेल महापालिकेला पत्र पाठवून सर्वेक्षणाला सुरुवात करण्यात आली असून निसर्गाप्रेमी कार्यकर्ते सुदीप आठवले आणि ज्योती नाडकर्णी हे सर्वेक्षणाचे नेतृत्व आणि समन्वय करत आहेत. सर्वेक्षनातून मिळणारी माहिती पालिका आणि वनविभागाला देण्यात येणार असल्याची माहिती सुदीप आठवले यांनी दिली आहे.






पेशवेकालीन वडाळे तलावाचे सुशोभीकरण करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतल्यानंतर तलावतील विविध प्रकारच्या जलपर्णीचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास झाला होता. यामुळे अनेक प्रकारचे प्रवासी पक्षी तलावापासून दुरावाले आहेत. परिसरात लावण्यात येणारी साऊंड सिस्टीम, पाण्याचे फवारे आणि आजूबाजूच्या इतर कामांमुळे उरलेल्या पक्षी आणि प्राण्यांच्या त्रासात भर पडत आहे. तलावाच्या सभोवतालच्या वॉकिंग ट्रॅकवर वॉकर आणि जॉगर्सच्या वाढत्या संख्येमुळे पक्ष्यांच्या प्रजाती कमी झाल्या आहेत. सरोवराच्या निर्जंतुकीकरणाच्या कामांमुळे कमळ आणि इतर झाडे नष्ट झाली होती.

> मान्सूनच्या आगमनानंतर वडाळे तलावात वाढलेल्या वनस्पतींमुळे मोठ्या संख्येने प्रजाती दिसून येतील असा आम्हांला विश्वास आहे. हंगाम आणि महिन्यानुसार आमच्या टीमद्वारे वेगवेगळ्या वेळी सर्वेक्षण केले जाईल.
> – सुदीप आठवले, अनुभूती संस्था

**बोटिंगला विरोध**

वडाळे तलावात बोटिंग सुरु करण्याचा प्रशासनाचा विचार आहे. निसर्गप्रेमींचा याला विरोध आहे. त्याच प्रमाणे परिसरातफूड स्टॉल सुरु करण्याला देखील विरोध आहे.

**सर्वेक्षणात आढळून आलेल्या प्रजाती**

पक्षी– ३६ जाती
फुलपाखरे– ४ प्रकार
इतर कीटक– २ प्रकार
वृक्ष– १५ प्रकार.

# तुकाराम मुंढेंची नियुक्ती करण्याची मागणी

**। उरण । वार्ताहर ।**

मत्स्य विभागाला वाळवी लागून भ्रष्टाचारांनी पूर्णपणे पोखरली गेली आहे. याबाबत अनेकवेळा लेखी तक्रारी होऊनही कारवाई करण्यास आयुक्त अतुल पाटणे हे अपयशी ठरत असल्याचे उघड होत आहे. यामुळे मच्छीमार बांधवांना न्याय देण्यासाठी व भ्रष्टाचार उघड करण्यासाठी मत्स्यविभागाच्या सचिवपदी लोकप्रिय कर्तव्यदक्ष अधिकारी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

मासेमारीस बंदी असतानाही उरणमधील करंजा बंदरातून मासेमारी सुरू आहे. याची माहिती अधिकारी वर्गांना दिल्यावर ते मी एक महिला अधिकारी असूनही माझ्या परीने कारवाई करते याचा विचार करावा, अशी उत्तरे देत आपली बाजू सुरक्षीत करण्याचा प्रयत्न करतात. तसेच, बोटींच्या नंबरवर कलर लावला जातो अथवा खोटे नंबर लावून मासेमारी केली जाते. यामुळे दहशतवादी कारवाया घडण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचा संशय व्यक्त केला.

या सर्वांवर नियंत्रण ठेवण्यासाठी व भ्रष्टाचार उघड करण्यासाठी मत्स्यविभागाच्या सचिवपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# नवे दलित राजकारण

लोकसभा निवडणुकांमध्ये दलित आणि मुस्लिमांची मते अनेक ठिकाणी निर्णायक ठरली. ती भाजपच्या विरोधात आणि काँग्रेस आघाडीच्या बाजूने पडली. उत्तर प्रदेशात मायावतीच्या बहुजन समाज पक्षासाठी जाटव, पासी अशा अतिदलित जातींची मते ही हक्काची मानली जातात. लाट कोणाचीही असो ही मते फिरत नाहीत. यंदा मात्र हे चित्र साफ बदलले. समाजवादी व काँग्रेस यांची युती होती. समाजवादी पक्षाने मोठ्या प्रमाणात मागास जातींचे उमेदवार दिले होते. त्यामुळे अयोध्येच्या खुल्या जागेवरही समाजवादीचा मागास उमेदवार जिंकला. महाराष्ट्रात प्रकाश आंबेडकरांच्या वंचित बहुजन आघाडीने गेल्या निवडणुकीत स्वतःची ताकद निर्माण केली होती. २०१९ मध्ये वंचितने ओवैसींच्या एमआयएमसोबत युती करून सुमारे सात टक्के किंवा ४४ लाख मते मिळवली होती. त्यावेळी आंबेडकरांनी बौध्द, चर्मकार, मांग या दलित जातींसोबतच ओबीसींमध्ये मोडणाऱ्या पण मागास, गरीब व संख्येने अतिशय कमी असलेल्या जातींना सोबत घेतले. वंचितने घेतलेल्या मतांमुळे काँग्रेसचा नऊ-दहा ठिकाणी पराभव झाला. त्या जिवावर यंदा आंबेडकरांनी महाविकास आघाडीवर बराच दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. शिवसेनेशी त्यांची युती आधीच झाली होती. काँग्रेस आणि राष्ट्रवादीला आपल्या उपद्रवक्षमतेची आठवण करून देऊन अधिक जागा पदरात पाडून घेण्याचा त्यांचा प्रयत्न होता. पण आपल्याला नक्की किती व कोणत्या जागा हव्या आहेत ते त्यांनी कधीही सांगितले नाही. शिवाय, काँग्रेस नेत्यांवर व धोरणांवर टीका करणे त्यांनी चालूच ठेवले. त्यातून ते भाजपला मदत करू पाहत आहेत हा समज बळावला. एकीकडे मुंबईतल्या शिवाजी पार्कवरच्या आघाडीच्या संयुक्त सभेत ते सहभागी झाले. त्यांनी भाषणही केले. पण इतके करूनही त्यांची चाल वाकडीच राहिली. अंतिमतः ते वेगळे लढले. पण यंदा त्यांना अवघी पंधरा लाख किंवा जेमतेम एक टक्का मते मिळाली. बहुसंख्य ठिकाणी बौध्दांसकट सर्व दलितांनी आंबेडकरांचा आदेश झुगारून दिला.

### मतदार म्हणजे गुलाम नव्हेत

मायावती, प्रकाश आंबेडकर किंवा तत्सम नेत्यांनी आपल्या मतदारांना गुलाम समजणे थांबवले पाहिजे हाच या निवडणुकीचा संदेश आहे. २०१९ मध्येही राज्यातील सर्व दलित व आदिवासी आंबेडकरांच्या मागे होते असे नाही. तेव्हाही अनेक राखीव जागा भाजपने जिंकल्या होत्या. मात्र दलितांचे एकगठ्ठा मतदान घडवण्याची ताकद इतर कोणाहीपेक्षा आपल्याकडे अधिक आहे हे आंबेडकरांनी दाखवून दिले होते. मात्र या ताकदीचा सदुपयोग त्यांनी केला नाही. गेल्या पाच वर्षात पक्षबांधणीसाठी शून्य प्रयत्न केले. कोणताही ठोस कार्यक्रम मांडला नाही. यंदाच्या लोकसभेसाठी देखील त्यांचा स्वतःचा असा ठाम अजेंडा नव्हता. नरेंद्र मोदी यांच्या हुकुमशाहीविरोधात ते बोलत होते. मोदींना हरवायचे तर काँग्रेस आघाडीला ताकद देणे आवश्यक होते. काँग्रेसच्या सरंजामी, भांडवली राजकारणाला शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी किंवा कम्युनिस्ट इत्यादी पक्षांनी वेळोवेळी विरोध केलेला आहे. रायगड, सोलापूर, कोल्हापूर, उस्मानाबाद, बीड इत्यादी जिल्ह्यांमध्ये शेकापचा मुख्य प्रतिस्पर्धी काँग्रेसच राहिलेला आहे. तरीही यावेळची राजकीय स्थिती वेगळी होती. मोदींची एकाधिकारशाही हा महत्वाचा मुद्दा बनला होता. मोदींना पुन्हा पाशवी बहुमत मिळाले तर विरोधक तुरुंगात जातील असे वातावरण होते. निवडणुका होतील की नाही अशी भीती वाटत होती. अशा वेळी सर्व मतभेद बाजूला ठेवून मोदींच्या विरोधात लढणे आवश्यक होते. मोदींच्या भाजपने गेल्या पाच वर्षात मुस्लिम म्हणजे देशद्रोही, अतिरेकी असे चित्र उभे केले. त्यांच्यावर जणू बहिष्कार घातला. दुसरीकडे आरक्षण काढून घेण्याची चर्चा आताच नव्हे तर गेली चार वर्षे आडून आडून चालू आहे. दलितांमधील बौद्ध वगळता इतर जातींमध्ये हिंदुत्वाची प्रतिके घुसवून त्यांना भाजप-भक्त करण्याचे प्रयत्न जारी आहेत. मनुस्मृतीतले श्लोक नवीन शैक्षणिक धोरणात घुसवले जात आहेत. भाजपची दलितविरोधी मनोवृत्ती स्पष्ट दिसते आहे. भाजपच्या आर्थिक धोरणांचा फटका गरिबांना व पर्यायाने दलितांनाच सर्वाधिक बसला आहे.

### भाजप आणि काँग्रेसमध्ये फरक

या पार्श्वभूमीवर वंचितने थोड्या वाटाघाटी करून काँग्रेस आघाडीच्या सोबत राहणे अधिक योग्य होते. मोदींना हरवण्याची शक्यता त्यामुळे वाढणार होती. काँग्रेसविरोधातील लढाई नंतर लढता येईल, मात्र मोदींच्या राजवटीत अस्तित्व टिकवणे व सामर्थ्य वाढवणे महत्वाचे होते. आंबेडकरांनी मात्र मोदींइतकीच काँग्रेस ही आपली शत्रू असल्याची भूमिका घेतली. सुदैवाने, दलित समाजातील बहुसंख्य लोक हे अज्ञानी राहिलेले नाहीत. ते चांगलेच जागृत असून राजकारणाचे सर्व संदर्भ त्यांना चांगले आकळतात. आपल्या समाजाचे हित तसेच व्यापक देशाचे हित त्यांना समजते. आंबेडकरांच्या विरोधातील भूमिका घेण्याची स्वतंत्र दृष्टी त्यांच्यात आहे. यंदाच्या लोकसभेला याचाच प्रत्यय आला. दुसरीकडे मुस्लिमांनाही एमआयएम किंवा इतर पक्षांनी विचलित करण्याचा प्रयत्न केला. काही जिल्ह्यांमध्ये पैसे वाटून त्यांची मते विकत घेण्यात काही लबाड व दगाबाज यशस्वी झाले हे खरे आहे. पण बहुतांश ठिकाणी ते यशस्वी झाले नाहीत. याचे कारण, आपल्या मतांचे मूल्य आणि देशाची गरज याची ओळख त्यांना समजून चुकली आहे. आजच्या स्थितीत नवे दलित राजकारण उभे करायचे तर याचे भान ठेवावे लागेल. दलित म्हणजे मुकी बिचारी कोणीही हाका अशी जनता राहिलेली नाही. खरे तर हे सर्व समाजाबाबतच खरे आहे. पण दलितांबाबत इतरांहूनही अधिक. शिक्षित व मध्यमवर्गीय दलित आपली सांस्कृतिक ओळख वेगळी ठेवून पण याच समाजात पुढे जाण्याचा आपला हक्क मागत आहेत. नोकऱ्याच नव्हे तर सर्व प्रकारच्या विकासात आपल्याला न्याय्य वाटा मिळायला हवा असे त्यांचे म्हणणे आहे. ते याचकांच्या भूमिकेत नाहीत. त्यांनी अत्यंत विचारपूर्वक आपले मतदान केले आहे. मोदींची आरक्षण न हटवण्याची गॅरंटी त्यांनी जशी नाकारली आहे तसेच प्रकाश आंबेडकर यांच्याकडेही पाठ फिरवली आहे. येत्या विधानसभा निवडणुकांमध्ये अधिक मते व जागा मिळवायच्या असतील तर याचे भान ठेवूनच त्यांना राजकारण करावे लागेल.

विचार

# वाढती उष्णता, ढासळणारे अर्थकारण

***वाढत्या उष्णतेमुळे अवघे जग आजारी पडण्याची शक्यता आहे. पृथ्वीवरील वाढत्या तापमानाचा मानवी आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होतो. स्थिर हवामानापासून दूर जाण्याचे परिणामदेखील आश्चर्यकारक असतील. यामुळे काही जुने रोग नव्याने पसरु शकतात तर काही नवे रोग उद्‌भवू शकतात. काही तज्ज्ञांच्या मतानुसार पूर्णपणे नवे रोगही उद्‌भवू शकतात. वाढत्या उष्णतेचा शेतीवर आणि अर्थकारणावरही प्रतिकूल परिणाम होतो.***

मिलिंद बेंडाळे

यंदा केवळ राष्ट्रीय राजधानी क्षेत्र आणि भारतातच नाही तर संपूर्ण आशिया खंडात उष्णतेच्या लाटांची तीव्रता वाढलेली बघायला मिळाली. 'वर्ल्ड वेदर ॲट्रिब्युशन ग्रुप'च्या एका नवीन अभ्यासात आढळून आले की हवामान बदलामुळे सरलेल्या एप्रिलमध्ये संपूर्ण आशियातील उष्णतेच्या लाटेची तीव्रता लक्षणीयरित्या वाढली आहे. या काळातील विक्रमी तापमानाचा परिणाम कोट्यवधी लोकांवर झाल्याचे या अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. उष्णतेच्या लाटांची वारंवारता आणि तीव्रता वाढवण्यात मानवी हस्तक्षेपामुळे झालेल्या हवामानातील बदलांनी मोठी भूमिका बजावली. एप्रिलमध्ये आशियातील अनेक प्रदेशांनी आतापर्यंतचे सर्वात उष्ण दिवस अनुभवले. म्यानमार, लाओस, व्हिएतनाम आणि फिलीपिन्स या देशांमध्ये प्रथमच उच्च तापमान दिसून आले. उष्ण रात्रीही अनुभवायला मिळाल्या. भारतातील तापमान ५२ अंश सेल्सिअसपर्यंत वाढले तर पॅलेस्टाईन आणि इस्रायलमध्येही ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त उष्णतेचा सामना करावा लागला. अतिउष्णतेमुळे अनेकांचा मृत्यूही झाला.

असह्य उष्णतेमुळे भारतात निवडणुकीच्या काळात एकाच दिवशी १६६ जणांचा मृत्यू झाला. त्यात निवडणूक कामामध्ये असणाऱ्या २२ कर्मचाऱ्यांचा समावेश होता. उष्णतेच्या लाटेमुळे पीक निकामी होणे, पशुधनाचे नुकसान, पाण्याची कमतरता, मासे मरणे आणि शाळा बंद पडणे असे प्रकार घडले. संशोधकांनी सध्याच्या हवामानाची तुलना पूर्व-औद्योगिक हवामानाशी केली आहे. मानवी हस्तक्षेपामुळे सध्याचे तापमान सुमारे १.२ अंश सेल्सिअसने वाढले. विश्लेषण दर्शवते की पश्चिम आशियामध्ये तीव्र उष्णतेच्या लाटा आता पाचपट जास्त असून तापमानवाढ १.७ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त आहे. फिलीपिन्समध्ये एल निनोच्या काळात उष्णतेच्या लाटांची वारंवारता आणि तीव्रता वाढत आहे. दक्षिण आशियामध्ये अशाच उष्णतेच्या लाटा पूर्वीच्या तुलनेत ४५ पट अधिक वारंवारतेने आणि ०.८५ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त वाढीने धडकत आहेत. एकंदरच वाढत्या तापमानामुळे नागरिक त्रस्त झाले असून हा अभ्यास असुरक्षित लोकसंख्येवर अतिउष्णतेचा असमान परिणाम अधोरेखित करतो.

गाझामध्ये बरेच विस्थापित लोक उष्णतेपासून सुरक्षित राहण्यासाठी तंबूमध्ये राहतात. मात्र तिथे आरोग्य सेवा आणि स्वच्छ पाण्याची बोंबाबोब आहे. दक्षिण आणि आग्नेय आशियामध्ये लाखो लोक अनधिकृत वस्त्यांमध्ये राहतात. उष्ण झळांमुळे शेतकरी आणि रस्त्यावरील विक्रेते प्रभावित झाले आहेत. संशोधक असुरक्षित गटांचे संरक्षण करण्यासाठी प्रभावी उष्णता कृती योजनांच्या गरजेवर भर देतात. हवामानबदलाचे परिणाम कमी करण्यासाठी आणि पुढील तापमानवाढ रोखण्यासाठी उत्सर्जन कमी करण्यासाठी तातडीच्या उपाययोजना कराव्यात, असेही अभ्यासक सांगत आहेत.

तज्ज्ञांच्या मते, हा अभ्यास हवामानातील बदलांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आणि अतिउष्णतेच्या वाढत्या धोक्यापासून असुरक्षित लोकांचे संरक्षण करण्याची तातडीची गरज अधोरेखित करतो. जागतिक तापमान वाढत असताना दुष्परिणाम कमी करण्यासाठी सर्वसमावेशक कृती योजना राबवणे महत्त्वाचे आहे. मलेरियाच्या डासांमुळे पसरणाऱ्या संसर्गामुळे गेल्या दशकात दर वर्षी अर्ध्या दशलक्षाहून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. यापैकी बहुतेक मुले होती आणि जवळजवळ सर्व (२०२२ मध्ये ९५ टक्के) आफ्रिकेतील होती. संसर्गजन्य डासांच्या उत्पत्तीस उबदार तापमान, दमट हवा आणि प्रजननासाठी डबके या तीन गोष्टी कारणीभूत असतात. हवामान आणि मलेरियाचा प्रसार यांच्यातील संबंध गुंतागुंतीचा आहे आणि जवळपास तीन दशकांपासून त्यावर सखोल अभ्यास सुरू आहे.

ताज्या संशोधनाचा बराचसा भाग आफ्रिकेवर केंद्रित आहे. स्मिथ आणि थॉमस या अभ्यासकांनी मलेरियाच्या जोखमीचे संपूर्ण खंडव्यापी विश्लेषण तयार करण्यासाठी तापमान आणि जल परीसंचरण अंदाज एकत्रित केले. त्यांच्या बंधनातून उष्णकटिबंधीय रोग मुक्त होऊ शकतील, कारण त्यांना वाहून नेणारे कीटक विषुववृत्ताच्या पलीकडे टिकून राहतील. हे आधी फ्रान्समध्ये घडत आहे. तिथे २०२२ च्या कडक उन्हाळ्यात डेंगी तापाची प्रकरणे वाढलेली आढळली. वेनेटो (इटली) तील सखल प्रदेश क्युलेक्स डासांसाठी एक आदर्श निवासस्थान म्हणून उदयाला येत आहे. संशोधनानुसार वाढत्या तापमानामुळे मलेरिया आणि डेंगी यासारख्या डासांपासून पसरणाऱ्या रोगांचा जागतिक प्रसारही बदलेल. ब्लूटंग हा लहान कीटकांद्वारे प्रसारित होणारा विषाणू, आशिया आणि आफ्रिकेपेक्षा मध्य आफ्रिका, पश्चिम रशिया आणि अमेरिकामध्ये मेंढ्यांना संक्रमित करण्याची शक्यता जास्त आहे. हवामानातील बदल मेंदूच्या बदलाच्या स्थितीची काही लक्षणेही वाढवत आहे. आपला मेंदू तापमान श्रेणीच्या मर्यादेत उत्तम कार्य करतो. मात्र त्याच्यासाठी तापमानातील थोडीशी वाढदेखील महत्त्वाची असू शकते. हवामानबदलाशी संबंधित अतितापमानाशी मेंदू त्याच्या तापमानाचे नियमन करण्यासाठी संघर्ष करतो तेव्हा काही प्रतिकूल परिणाम दिसतात. हा धोकाही लक्षणीय आहे. निरोगी राहणे हे काय खावे किंवा किती वेळा व्यायाम करता यावर नियंत्रण ठेवण्याइतके सोपे नाही.

कँटरबरी विद्यापीठातील एपिडेमियोलॉजी आणि पर्यावरणीय आरोग्याचे सहयोगी प्राध्यापक अरिंदम बसू म्हणतात, तीन वर्षांपेक्षा कमी कालावधीत जागतिक आरोग्य संघटनेने दोन सार्वजनिक आरोग्य आणीबाणी जाहीर केल्या आहेत. फेब्रुवारी २०२० मध्ये कोविड आणि जुलै २०२२ मध्ये मंकीपॉक्स. जागतिक तापमानवाढीदरम्यान अधिवासातील बदलांमुळे मानव आणि प्राणी यांच्यातही बदल होतो. शेतीसाठी जंगले नष्ट होत असल्याने तसेच विदेशी प्राण्यांचा व्यापार सुरू असल्याने मानव आणि वन्य प्राणी यांच्यातील संघर्ष वाढत आहे. त्याच वेळी, हिमनद्या वितळल्याने बर्फाखाली लपलेले सूक्ष्म जंतू बाहेर पडत आहेत. मानव आणि प्राण्यांच्या संसर्गासारखीच रोगजंतूंची परिसंस्था असल्याने आरोग्याच्या नवीन संकल्पनेची तातडीची गरज आहे. येत्या काही दिवसांमध्ये उष्णतेची स्थिती आणखी गंभीर होणार असल्याचा इशारा भारतीय हवामान खात्याने दिला आहे. आधीच जवळपास संपूर्ण देश उष्णतेच्या लाटेने ग्रासलेला दिसला. या उन्हाळ्याच्या स्थितीचा देशाच्या अर्थव्यवस्थेवरही परिणाम होत आहे. भारतात, मे-जून महिन्यांमधील तीव्र उष्णता आणि उष्णतेची लाट आता सामान्य बनत आहे. हवामानबदल आणि जंगलतोडीचा प्रभाव यापेक्षा जास्त कधीच दिसून आला नाही; मात्र वाढती उष्णता आणि उष्णतेच्या लाटेचा सर्वात वाईट परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होत असल्याचे आता समोर येत आहे. मोठ्या लोकसंख्येला रोजगार देणारे हे अर्थव्यवस्थेचे स्वरूप आहे.

आज देशातील ५० टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळेच धोरणकर्त्यांसाठी वाढती उष्णता ही चिंतेची बाब आहे कारण यामुळे केवळ ५० टक्के लोकसंख्येच्या उपजीविकेपुढे प्रश्नचिन्ह निमर्ण होत नाही तर देशाची अन्नसुरक्षाही धोक्यात येते. दुसरी बाब म्हणजे देशातील सुमारे ८३ टक्के कामगार या क्षेत्रात काम करतात. जागतिक नाणेनिधीचा अंदाज आहे की, देशातील ९० टक्क्यांपेक्षा अधिक कष्टकऱ्यांना उष्णतेच्या लाटेचा फटका बसला आहे. उष्णतेच्या लाटेमुळे होणारे एकूण अर्थव्यवस्थेचे नुकसान पाहिल्यास प्रश्नाचे गांभीर्य समोर येते.

सध्या देशातील प्रमुख १५० जलाशयांमधील पाण्याची पातळी ३० टक्क्यांहून अधिक खाली गेली आहे. दक्षिण भारतात परिस्थिती अधिक धोकादायक आहे. त्याचा परिणाम बंगळुरूसारख्या मोठ्या शहरातील जलसंकटाच्या रूपात दिसून आला. जलाशयांमध्ये पाणी कमी असल्याने पिण्याचे अपुरे पाणी, सिंचनासाठी कमी पाणी, चाऱ्याची कमी उपलब्धता, बागायती पिकांचे होणारे नुकसान, दूध आणि भाजीपाल्याचे वाढलेले भाव अशा समस्या दिसत आहेत. अलीकडेच रिझर्व्ह बँकेने वार्षिक अहवालात म्हटले की २०२३-२४ मध्ये अन्नधान्याचे चढे भाव हे महागाई उच्च राहण्याचे सर्वात मोठे कारण आहे. अन्नधान्य महागाई फारशी खाली येण्याची चिन्हे अजूनही दिसत नाहीत. याशिवाय कामगारांचे आरोग्य बाधित होत असल्याने पायाभूत सुविधा आणि उद्योग उत्पादनावरही परिणाम बघायला मिळत आहे. त्यामुळेच लोकांचा अनारोग्यापायी होणारा खर्च कमी करायचा असेल, अर्थव्यवस्थेची वाढ राखायची असेल तर ठोस उपाययोजना गरजेची आहे.

आजकाल

# गालिब की सहेली

ले.डॉ. श्रीरंजन आवटे

युनेस्कोने जगभरातील भाषांविषयीचा एक अहवाल २०१० मध्ये प्रसिद्ध केला. संपूर्ण जगात बोलल्या जाणाऱ्या भाषांची स्थिती यामध्ये मांडली होती. साधारण २५०० भाषांच्या अस्तित्वालाच धोका आहे, असे या अहवालात म्हटले होते. धोका असलेल्या सर्वाधिक भाषांची संख्या होती भारतात. भारतातल्या १९७ भाषांना धोका आहे, असे यात नोंदवले होते. युनेस्कोच्या निकषांनुसार एखादी भाषा बोलणा-या लोकांची संख्या १० हजाराहून कमी होते तेव्हा त्या भाषेला धोका आहे, असे मानले जाते. एकविसाव्या शतकाच्या अखेरीस अशा शेकडो भाषा मरुन जातील, अशी भीती युनेस्कोने व्यक्त केली होती. एखादी भाषा मरुन गेली तर त्यात काय विशेष, असे वाटू शकते. भाषा म्हणजे केवळ शब्द नसतात किंवा व्याकरणाच्या नियमांनीही भाषा आकाराला येत नाही. भाषा हा बोलणाऱ्या समूहाचा आत्मा असतो. त्यामुळे एखादी भाषा नष्ट होते तेव्हा त्या समूहाचा आत्मा मरतो. रघुवीर सहाय यांनी एका कवितेत म्हटले आहे.

''भाषा को शक्ति दे यह प्रार्थना करके
कवि मांगता है बचे रहने का वरदान''

भाषेचे हे मोल अपरंपार आहे. भाषेच्या या प्रेमासाठी बलिदानाची उदाहरणे आहेत. २१ फेब्रुवारी हा दिवस 'जागतिक मातृभाषा दिवस' म्हणून साजरा केला जातो. त्यालाही असाच संदर्भ आहे. २१ फेब्रुवारी १९५२ रोजी काही बंगाली विद्यार्थी पूर्व पाकिस्तानमध्ये आंदोलन करत होते. त्यांची मागणी होती बंगाली भाषेला अधिकृत भाषेचा दर्जा मिळावा. आंदोलकांना पोलिसांनी गोळ्या घातल्या. या गोळीबारात चार बंगाली विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या बलिदानामुळे २१ फेब्रुवारी हा दिवस मातृभाषा दिवस असेल, असे युनेस्कोने जाहीर केले. भारतातही पोट्टी श्रीरामलु या क्रांतिकारकाने तेलुगू भाषेचे स्वतंत्र आंध्र राज्य हवे, यासाठी आमरण उपोषण केले. त्यात त्यांचा मृत्यू झाला. अखेरीस स्वतंत्र आंध्रप्रदेशची स्थापना झाली. अशा मोठ्या घुसळणीतून भाषेचा इतिहास घडला आहे.

संविधानातील अनुच्छेद २९ मध्ये भाषेच्या संवर्धनाचा मुद्दा मांडलेला आहे. एवढेच नव्हे तर, न्यायालयाने जगदेव सिंग सिद्धांती विरुद्ध प्रताप सिंग दौलता (१९६४) या खटल्यात भाषेच्या रक्षणाकरता आंदोलन करण्याचा हक्क मान्य केला आहे. आजही भाषेच्या रक्षणासाठी अनेक समुदाय लढत आहेत. त्यापैकी एक महत्वाची भाषा आहे पाली. ही एक महत्वाची प्राचीन भाषा आहे. बौद्ध तत्त्वज्ञानाचे मूळ संदर्भ पालीमध्येच आहेत. विशेष म्हणजे पाली भाषा वेगवेगळ्या लिपींमध्ये लिहिली जात होती. मोठ्या प्रमाणावर सांस्कृतिक संचित या भाषेत उपलब्ध आहे. त्यासाठी पाली भाषेचे रक्षण जरुरीचे आहे. अलीकडे संस्कृत भाषेच्या रक्षणासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न होताना दिसतात; मात्र तुलनेने पाली भाषेकडे दुर्लक्ष होते.



पालीप्रमाणेच उर्दूने भारतीय संस्कृतीला समृद्ध केले आहे; मात्र उर्दू या भाषेला केवळ मुस्लीमांसोबत जोडले आहे. वास्तविक उर्दूला पूर्वी 'हिंदवी' नावाने ओळखले जात असे. ही भाषा हिंदू, मुस्लीमांसह इतर अनेक धर्माचे लोक बोलत असत. हळूहळू उर्दूलाही मुख्यप्रवाहातून दूर फेकले गेले. त्यामुळे आज उर्दूसारख्या भाषेचे रक्षण करण्याची नितांत आवश्यकता निर्माण झालेली आहे. इकबाल अशहर यांनी उर्दूविषयी एका कवितेत लिहिले आहे.

**''उर्दू है मेरा नाम, मै खुसरौ की पहेली
मै मीर की हमराज हूं, गालिब की सहेली!''**

गालिबची मैत्रीण असलेली उर्दू आपल्या सगळ्यांचीच मैत्रीण आहे. त्यासाठी साने गुरुजींनी सांगितलेला 'आंतरभारती'चा भाव आपल्या मनात हवा. मग भाषेचे मातृत्व आणि भाषाभाषांमधला भगिनीभाव लक्षात येऊ शकतो. एकोणतीसावा अनुच्छेद हेच सांगण्याचा प्रयत्न करतो.

लोकसंसद

### भारतातील पाच शाळांना नामांकन

युनायटेड किंगडममधील 'टी एज्युकेशन' या संस्थेकडून 'जगातील सर्वोत्तम शाळा पुरस्कार' दिला जातो. यंदाचे पुरस्काराचे हे तिसरे वर्ष असून या पुरस्कारासाठी भारतातील पाच शाळांना नामांकन मिळाले आहे. मध्य प्रदेशातील दोन शाळा आणि दिल्ली, महाराष्ट्र आणि तामिळनाडूमधील प्रत्येकी एका शाळेचा यात समावेश आहे. समुदाय सहयोग, पर्यावरणीय कृती, नावीन्य, प्रतिकूलतेवर मात करणे आणि निरोगी जीवनाचे समर्थन करणे अशा पाच श्रेणीमध्ये हे पुरस्कार दिले जातात. यामध्ये महाराष्ट्रातील मुंबई पब्लिक स्कूल एल के वाघजी इंटरनॅशनल (आयजीसीएसई) या शाळेला प्रतिकूलतेवर मात करणे या श्रेणीत नामांकन मिळाले आहे. दहापैकी सर्वोत्तम तीन शाळांची नावे सप्टेंबरमध्ये जाहीर करण्यात येणार असून विजेत्या शाळेचे नाव नोव्हेंबरमध्ये जाहीर केले जाईल. अंतिम पाच विजेत्यांना ५०००० अमेरिकन डॉलरचे बक्षीस विभागून देण्यात येणार आहे. खरे तर यंदा जगभरातील विविध श्रेणींमध्ये ५ भारतीय शाळांसह ५० शाळांना नामांकन मिळाले आहे. त्यामुळे जगातील सर्वोत्कृष्ट शाळेसाठी तगडी स्पर्धा आहे. मात्र गेल्यावर्षी २०२३ मध्ये 'नावीन्य' या श्रेणीमध्ये अहमदाबादच्या रिव्हरसाइड स्कूलला प्रथम पारितोषिक मिळाले होते. त्यामुळे यंदा भारतीय शाळांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. **-प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१९ जून**

**१८९६** : मनोरमाबा कवयित्री असा नावलौकिक मराठी स मनोरमाबाई रानडे यांचा जन्म १८९६ रोजी झाल हिवरगावकर. पुढे दळवी स्कॉलरशीप आणि परमानंद पारितोषिक त्यांनी पटकावले. फर्ग्युस गदवी संपादन केली. १९१४ साली श्री. बा. रान असताना प्रा. वासुदेवराव पटवर्धनांमुळे त्य 'गोपिकातनया' या नावाने त्या काव्य लिहित. पत्रकार, संपादक, कादंबरीकार श्री. भि. सरदेसाई यांचा जन्म १८६१ साली झाला. फॉरेस्ट्री कोर्स पूर्ण झाल्यावर त्यांनी सरकारी वनखात्यात नोकरी पत्करली. तथापि, गोऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्याशी न पटल्याने त्यांनी नोकरी सोडली. यानंतर 'पुणे वैभव' चे संपादक झाले. पण येथेही न पटल्याने सांगली व कोल्हापूर येथे काही काळ शिक्षक म्हणून काम केले. कोल्हापूर नगरपालिकेचे एक्झिक्युटिव्ह ऑफिसर म्हणूनही काही काळ त्यांनी काम केले. याशिवाय 'नाट्यकथार्णव' या मासिकाचे आणि 'राष्ट्रमन' या साप्ताहिकाचे संपादक म्हणूनही काम केले. भाषांतरीत कादंबऱ्या या प्रकाशनासाठी 'कादंबरीकल्प' नावाचे मासिक त्यांनी काढले. सरदेसाईचे मराठी साहित्याला योगदान असे की, त्यांनी परक्या भाषेतील चांगले लेखन मराठी भाषिकांपुढे आणले तसेच मराठी वाचकांचा अद्भुत आणि कल्पनारम्य कादंबऱ्यांचा प्रभाव कमी व्हावा यासाठी त्यांनी लेखन केले. या लेखनात त्या काळातील लंडन शहराचे सर्वांगीण दर्शन घडवणारी रेनॉल्डसच्या मिस्टरी ऑफ लंडन चा अनुवाद लंडन रहस्य या नावाने केला. ही कादंबरी त्यांची गाजली. कारण या कादंबरीतून लंडन शहरातील सद्गुण-सदाचाराचे दर्शन घडवून सद्गुणांचा जय झाला आहे. असे दाखवले आहे. याशिवाय पाणी (गुणधर्म, पदार्थ विज्ञान) हे त्यांचे आणखी एक प्रसिद्ध पुस्तक याशिवाय पुष्कळ लेखन तत्कालिन मासिक, साप्ताहिक आणि वृत्तपत्रातून त्यांनी केले. 'कुवालयपुरची राणी कुमुदूती' या काल्पनिक कादंबरीतून मध्ययुगीन काळ त्यांनी चित्रित केला आहे.१८ जून १९४२ रोजी त्यांचे निधन झाले. **१८७७:-** कृषीतज्ञ आणि शेती, पशुसंवर्धन शिक्षण, सहकार, स्थानिक स्वराज्य या विषयांवर लेखन करणारे लेखक प्राचार्य पांडुरंग चिमणाजी पाटील यांचा जन्म. **१८९८:-** कथाकार, अनुवादक आणि मीमांसाभूषक या बिरुदावलीने गौरविलेले पुरुषोत्तम बाळकृष्ण साठे यांचा जन्म. 'कथापंच', 'चित्तरंजन' तसेच '१९२४ चा महाराष्ट्र', 'हिंदुस्थानचा नागरिक : पुस्तक पहिले, दुसरे, तिसरे', 'सुलभ अर्थशास्त्र' या व्यतिरिक्त काश्मीरवर त्यांनी 'काश्मीरची तोंडओळख' हे पुस्तक लिहिले. १७ फेब्रुवारी १९७८ रोजी यांचे निधन झाले. **१९१३:-** कवी, भाषांतरकार सीताराम वासुदेव पेंडसे यांचे निधन. ह्यांची 'शिशू संमेलनोत्सव' व 'श्रीमज्जयसिंह विवाह' ही दोन प्रासंगिक काव्ये तर 'पद्यसुमनांजली' हे स्फूट कवितांचे संकलन. तसेच मॅकडोनेलच्या इंग्रजी ग्रंथाचे भाषांतर 'संस्कृत वाङ्‌मयाचा इतिहास' या नावाने प्रसिद्ध आणि ङ्गरसतरंगिणीफ हे प्राचीन व अर्वाचीन मराठी कवितेतील निवडक वेच्यांचे संपादन अशी साहित्य संपदा. **१९३०:-** शिक्षण क्षेत्रात पाठनिर्देशक, अधिव्याख्याते, प्राध्यापक ते प्राचार्य अशी मुशाफिरी करणारे लेखक, संख्याशास्त्र व गणितशास्त्राचे अभ्यासक प्राचार्य निळकंठ माधव डोंगरे यांचा जन्म. व्यापारी गणित, वाणिज्य वर्गासाठी पाठयपुस्तक त्यांनी लिहिली. **१९३१:-** लेखक, समीक्षक, मराठी लोक साहित्य संशोधन मंडळाचे संस्थापक सदस्य प्रा. डॉ. मधुकर रामदास जोशी यांचा जन्म. ह्यांच्या ग्रंथसंपदेत 'दत्तगुरुंचे दोन अवतार','नलोपाख्यान' ह्या ग्रंथाचे संपादन, 'नाथ संप्रदाय' हा ऐतिहासिक, 'मनोहर अंधानगरी' हा संशोधनात्मक ग्रंथ तसेच 'ज्ञानदेव चरित्र संशोधन', 'ज्ञानेश्वर आणि वाङ्‌मयीन परंपरा','ज्ञानेश्वरी संशोधन', 'प्राचीन मराठी वाङ्‌मय कोश' आदी ग्रंथ त्यांच्या अभ्यासू वृत्तीची साक्ष देतात. **१९३२:-** मराठी संतवाङ्‌मयाचे अभ्यासक रेव्ह. जस्टिन एडवर्ड ॲबट यांचे निधन. ॲबट यांनी 'पोएट सेंट्स ऑफ महाराष्ट्र' अशी ग्रंथमाला तयार केली. या मालेतून त्यांनी 'एकनाथी भागवत', 'तुकारामांची गाथा', 'दासोपंत', 'रामदास', 'संत बहिणाबाई' अशी १२ पुस्तके इंग्रजीतून लिहिली. 'स्टोरीज ऑफ इंडियन सेंट्स' ही महिपतीकृत भक्तविजयाचा अनुवादही ॲबट यांनी, पं.नरहर रा. गोडबोले यांच्या सहकार्याने केला होता. संतवाङ्‌मयाप्रमाणेच पुरातत्त्वीय शिलालेखांचे वाचन, अभ्यास व भाषांतर यांतही त्यांना रस होता. **१९४५:-** लेखक पद्‌माकर भागुजी दराडे यांचा जन्म. 'वाकयाची वाडी' ह्या कादंबरीसह आकाशवाणीवर काही नभोनाट्ये त्यांची सादर झाली आहेत. १९५४:- कवी रंजना सीताराम हलमारे यांचा जन्म. यांचा 'आर्त स्वर' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. १९८९:- सामाजिक, वास्तव आणि भक्तिभाव, प्रेम इत्यादी विषयांना स्पर्श करणारे काव्यलेखन. कवी जाफरशा फकरुशा मदार उर्फ जाफर आदमपूरकर यांचा जन्म. त्यांचा 'माझ्या मायदेशी' हा काव्यसंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहे. **१९९८:-** विनोदी कथालेखक व प्रवासवर्णनकार रमेश राजाराम मंत्री यांचे निधन. त्याचे मूळ नाव रमेश शंकर कुळकर. दत्तकविधी झाल्यानंतर ते ङ्गमंत्रीफ बनले. त्यांच्या नावावर १०० हून अधिक पुस्तके आहेत. 'जनू बांडे' ही त्यांनी निर्माण केलेली व्यक्तिरेखा मराठी विनोदी साहित्यात लक्षणीय ठरली. 'थंडीचे दिवस', '१९९१ च्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१९ जून
१) श्रीम. श्रद्धा प्रवीण शहा
विद्यानगर, अलिबाग, १९-६-१९५७


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**



कुंदा विजय वार्डे, वाढदिवस, अलिबाग



कै. श्री. दिनानाथ राघव वर्तक, स्मरणार्थ, चौल, अलिबाग

कै. श्री. दुर्गादास हंसराज पेवाल, स्मरणार्थ अलिबाग


### 'माझ्या लेखनीतून' पुस्तकाची भेट

**। नागोठणे । वार्ताहर ।**

कोकणएज्युकेशनसोसायटीच्यानागोठण्यातील बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. श्रीकृष्ण तुपारे यांनी लिहिलेल्या 'माझ्या लेखनीतून' या संग्रहित लेख असलेल्या तसेच अन्य एका पुस्तकाची भेट महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. दिनेश भगत यांना दिली.

# मुख्यमंत्री साहेब, आम्हाला घरं कधी मिळणार?

## कंटेनरमध्ये जीव कोंडतोय, इर्शाळवाडी दरडग्रस्तांनी मांडली व्यथा; वर्षभरापासून इर्शाळवाडी दरडग्रस्त नवीन घराच्या प्रतीक्षेत

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडीवर १९ जुलै २०२३ रोजी मध्यरात्री काळाने घाला घातला. मुसळधार पावसात दरड कोसळून ८४ निष्पाप नागरिकांचा मातीच्या ढिगाऱ्यात गाढल्याने मृत्यू झाला. त्यानंतर सरकारने दरडग्रस्त नागरिकांना इर्शाळवाडीच्या पायथ्याशी चौक क्षेत्रात तात्पुरत्या निवाऱ्याची कंटेनरमध्ये राहण्याची व्यवस्था केली. मात्र, इथं आजही नागरिकांना कष्टप्रद आणि संघर्षमय जीवन जगावे लागतेय. याठिकाणी मूलभूत पायाभूत नागरी सेवा सुविधांचे तीनतेरा वाजल्याची परिस्थिती आहे. कुणी घर देता का घर, इर्शाळवाडी दरडग्रस्त ग्रामस्थांवर पावसाळ्यात जीव मुठीत घेऊन कंटेनर मध्ये राहण्याची वेळ आली आहे. याठिकाणी पाणी, आरोग्य, शौचालय, स्वच्छतागृहाची दुरवस्था, पाण्याचा अभाव आदी समस्यांचा सामना येथील नागरिकांना दैनंदिन करावा लागतोय. आम्हाला इथं आणून ठेवलं खरं; पण आमच्याकडे ढुंकून बघायलाही कुणाला वेळ नाही, अशी व्यथा येथील संतप्त महिलांनी मांडली.



मागील वर्षी स्वातंत्र्यदिनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दुर्घटनाग्रस्त इर्शाळवाडीच्या पुनर्वसन केलेल्या तात्पुरत्या कंटेनर हाऊसमधील निवारा ठिकाणी भेट दिली, अधिकारी आणि दुर्घटनाग्रस्त यांच्याशी चर्चा करून पुनर्वसनाबाबत आराखडा, जागा, तेथील दळणवळण विकास यावर चर्चा करून रोजगाराबाबत तरुणांना नोकरी देण्याची हमी दिली होती. सर्व सोयी सुविधा उपलब्द करून सहा महिन्यांत इर्शाळवाडीचे पुनर्वसन करू, असे आश्वासन दिले होते. मात्र, अजून पुनर्वसन झाले नसल्याचे दरडग्रस्त नागरिकांचे म्हणणे आहे.

इथं तात्पुरत्या निवारा शेडमध्ये (कंटेनर) राहणारे बामा जानू पारधी यांनी यावेळी समस्यांचा पाढाच वाचला. ते म्हणाले, उन्हाळ्यात कंटेनरमध्ये उकाड्याने खूप त्रस्त झालो, तर आता पावसाळ्यात कंटेनरमध्ये पावसाचे पाणी शिरून घरातले साहित्य, अंथरून भिजत आहे. आम्ही पावसामुळं रात्री उठून बसतो. दरवाजा उघडला तर पाणी आत शिरते, दरवाजा बंद केला तर उकाडा होतो. सरकारने आम्हाला घरे देण्याचे आश्वासन दिले होते, मदत करण्याचे बोलले होते, ते अजून पूर्ण केलं नाही. आमच्या मुलांना नोकऱ्या देऊ म्हटले होते, पण कुठं नोकऱ्या दिल्या नाहीत, म्हणून ते वेठबिगारी करतात.

यावेळी बुधाजी हिरू पारधी म्हणाले की, इर्शाळवाडीवर दरड कोसळल्यावर आम्हाला सरकारने इथं आणून ठेवला. पण आमची इथं काही सोय नाही. कंटेनरमध्ये आम्ही राहतो, इथं प्यायला पाणी नाही, शौचालय, बाथरूमला पाणी नाही, पुरुष कुठंही जातील; पण महिलांचे हाल होतात. शासनाची माणसं येतात, बघून जातात, पण काही सोय करीत नाहीत.

येथील तरुण जगदीश कमळू पारधी याने सांगितले की, सरकारने आम्हाला तीन महिन्यात घरे देऊ असे आश्वासन दिले होते, पावसाळ्याच्या आत घरे देणार होते, पण अजून आम्ही कंटेनरमध्ये राहतोय, नोकऱ्या देतो म्हणाले होते, पण नोकऱ्या दिल्या नाहीत, आता आमच्याकडे व्यवसाय काही नाही, आम्हाला सरकारने नोकऱ्या द्याव्यात किंवा आमची वर असलेली शेतजमीन त्यास खाली पर्यायी शेतजमीन द्यावी, अशी आमची मागणी आहे.

येथील दरड ग्रस्त महिला पारधी यांनी सांगितले की, आमची मुलं बिगारी कामावर जातात, राशनवर धान्य देतात, पण ते धान्य घेऊन काय करणार, त्याला मीठ मसाला लागतो, इथं चूल पेटवायला काही आसरा नाही, गॅस वेळेत मिळत नाही, गढूळ पाणी पिऊन आम्हाला आजारपण येतेय. दिवाळीत घरे देणार होते, दिवाळी गेली पावसाळा आला, पण घरे काही मिळाली नाहीत, सरकारने आमच्याकडे लक्ष द्यावे. दरड केवळ गावावर नाही तर आमच्या आयुष्यावर कोसळली असल्याची भावना येथील नागरिक दुःखद अंत करणाने व्यक्त करीत आहेत. आमचा हक्काचा पारंपरिक शेतीचा पर्याय हिरावल्याने ताटातील हक्काची भाकरी मिळेनाशी झाली आहे, तरुणांवर वेठबिगारी करण्याची वेळ आली आहे. पिण्याच्या गढूळ पाण्याने आजारपण व रोगराई पसरत असल्याची ओरड सुरु आहे. सरकारने दिलेली आश्वासने गढूळ पाण्यातील तुरटीसारखी विरघळली असल्याने दरडग्रस्त नागरिक संताप व्यक्त करत आहेत. आमचे पुनर्वसन कधी होणार? आम्हाला हक्काची घरं कधी मिळणार? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

> इर्शाळवाडीतील दरडग्रस्त नागरिकांचे सुरक्षित जागेत पुनर्वसन करण्यात येत आहे. सिडकोच्या माध्यमातून नवीन जागेत ४४ घरांचे काम युद्धपातळीवर सुरु आहे. तसेच येथील रस्ते, नळजोडणी, वीज, शिक्षण, आरोग्य सेवा सुविधा देण्याचे नियोजनदेखील सुरु आहे. जूनअखेरपर्यंत हे काम पूर्ण करून ही घरे नागरिकांच्या ताब्यात देणार आहोत. शासन नागरिकांना चांगल्या सुविधा देण्यासाठी कटिबद्ध आहे.
> – आयुब तांबोळी, तहसीलदार

# पॉड हाऊस अडगळीच्या जागेत

## मोकळी जागा असतानाही तीन खोल्यांची निर्मिती

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरानमध्ये मध्य रेल्वे प्रशासनाकडून प्रवाशांच्या सोयीसाठी पॉड हाऊस बांधले जात आहे. या पॉड हाऊसबद्दल मोठा गाजावाजा मध्य रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आला आहे. मात्र, माथेरान येथे बांधण्यात आलेले पॉड हाऊस हे केवळ तीन खोल्यांचे आहे. ज्या ठिकाणी हे पॉड हाऊस बांधण्यात आले आहे, तेथील जागा पूर्णपणे अडगळीची आहे. माथेरान स्थानकात मोठ्या प्रमाणात जागा उपलब्ध असताना जुन्या नादुरुस्त इमारती यांच्यामध्ये हे पॉड हाऊस बनविण्यात आले आहे. दरम्यान, सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गैरसोयीचे आणि केवळ तीन खोल्यांचे हेच का ते पॉड हाऊस असा प्रश्न उपस्थित होत आहे.



माथेरानमध्ये मध्य रेल्वे प्रशासन पॉड हॉटेल आणि स्लीपिंग पॉड प्रकल्प सुरु करणार असल्याने पर्यटांकाना दिलासा मिळणार आहे. मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकात आलिशान पॉड हॉटेल आणि स्लीपिंग पॉड सुरु झाले आहे. माथेरान येथे स्थानकातील अडगळीच्या जागेत हे पॉड हाऊस बांधण्यात आले आहे. त्या पॉड हाऊस इमारतीची रचनादेखील आकर्षक नाही. त्याचवेळी आजूबाजूला अर्धवट कोसळलेल्या इमारती आणि पॉड हाऊसपर्यंत पोहोचण्यासाठी रस्तादेखील अडगळीचा आहे. त्यामुळे पॉड हाऊसबद्दल संभ्रमाचे वातावरण असून, माथेरान स्थानकात किमान ५० खोल्यांचे पॉड हाऊस बांधता येतील एवढी जमीन उपलब्ध आहे. त्यास्तही जुन्या अर्धवट कोसळलेल्या इमारती जमीनदोस्त करून जागा मोकळी केल्यास मोठी जागा तेथे निर्माण होऊ शकते, त्यामुळे माथेरान स्थानकात बनविण्यात आलेले पॉड हाऊस हे कर्मचाऱ्यांचे निवासस्थानासारखे वाटत असल्याने पॉड हाऊसची नक्की संकल्पना कोणती? असा प्रश्न उभा राहिला आहे.



# कृषी विभागामार्फत भाजीपाला मिनी कीटचे वाटप

**। उरण । वार्ताहर ।**

महाराष्ट्र शासन कृषी विभागामार्फत उरण तालुक्यात प्रकल्प संचालक आत्मा, अलिबाग- रायगड वंदना शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विभाग आत्मा अंतर्गत भाजीपाला मिनी किटचे वाटप करण्यात आले. या मिनी कीटमध्ये भेंडी, मिरची, चवळी, काकडी व वांगी इत्यादींचे बियाणे देण्यात आले आहे. सदरील पारसबाग भाजीपाला किटचे वाटप उरण तालुक्यात जवळपास ४० ते ५० गावात वाटप करण्यात आले असून, या किटचा फायदा जवळपास १५०० ते २००० कुटुंबांना होणार आहे.

यासंदर्भात माहिती देताना अर्चना सुळ-नारनवर, तालुका कृषी अधिकारी उरण यांनी उरण तालुक्यातील शेतकरी, शेतकरी गट, महिला शेतकरी गट, आदिवासी बांधव यांनी आपल्या घराच्या शेजारी पारसबागेत लागवड करुन आपल्या आहारात सेंद्रिय व ताज्या भाजीचे प्रमाण वाढावावे यामुळे मुख्यतः आरोग्य निरोगी राहण्यास मदत होणार आहे तसेच महिलांची आर्थिक बचत होण्यास मदत होईल, असे सांगितले. या मोहिमेंतर्गत जुई येथे महिला व महिला गटांना पारसबाग किटचे वाटप करण्यात आले. यावेळी कृषी विभागातील कर्मचारी विभावरी चव्हाण व नमिता वाकळे यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# खांडस येथील पुलाचा भाग रात्रीत पूर्ण



## स्थानिक शेतकऱ्यांचा विरोधामुळे रखडले होते बांधकाम

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील खांडस गावाच्या अलीकडे असलेल्या पुलाचे बांधकाम अर्धवट होते.त्या भागात पाऊस जोरात झाल्याने पुलाखालील नाला दुथडी भरून वाहू लागल्याने खांडस ग्रामस्थांची वाट बंद झाली होती. त्यामुळे ठेकेदाराने रात्रीचा दिवस करीत पुलाचे काम पूर्ण करून घेतले आहे. त्यात तेथे असलेल्या शेतकऱ्याने पुलाचे बांधकाम रोखून धरल्याने शेवटी ठेकेदाराला पोलिसात तक्रार करावी लागली होती. दरम्यान, पोलिसांनी संबंधित शेतकऱ्याला सरकारी कामात अडथळा करू नये अशी समज दिल्याने अखेर पुलाचे अर्धवट असलेले काम पूर्ण झाले असून, पुलावरून पायी जाण्याचा मार्ग सुरू झाला आहे.

कशेळे-खांडस राज्यमार्ग रस्त्यावर खांडस गावाच्या अलीकडे असलेल्या पुलाचे बांधकाम सुरू होते. मात्र, त्या पुलाचे बांधकाम तेथील शेतकरी करून देत नव्हता. त्यामुळे पुलाचे काम अर्धवट राहिले आणि शेवटी पावसाळा सुरू झाल्याने पुलाच्या खालून वाहणारा नालादेखील दुथडी भरून वाहू लागला. त्यावेळी खांडस ग्रामस्थांचा त्या नाल्यातून बनविलेला तात्पुरता मार्गदेखील बंद झाला होता. मंगळवारी आणि बुधवारी ही परिस्थिती खांडस गावात निर्माण झाली होती. त्यावेळी गावात जाण्यासाठी कोणताही पर्यायी मार्ग नसल्याने ग्रामस्थांनी शेवटी त्या शेतकऱ्याची समजूत काढण्याचे प्रयत्न केले.

दरम्यान, स्थानिक शेतकरी कोणाचेही ऐकून घेत नसल्याने शेवटी पुलाचे काम करणाऱ्या ठेकेदाराने नेरळ पोलीस स्टेशन गाठले. शेवटी सरकारी कामात अडथळा आणण्याचा गुन्हा दाखल होण्याची शक्यता निर्माण झाल्याने त्या शेतकऱ्याने माघार घेतली. त्यानंतर ठेकेदाराने रात्रीदेखील काम करून पुलाचे अर्धवट असलेले बांधकाम पूर्ण केले.

# ५२ वर्षांच्या मैत्रीचे सत्तराव्या वर्षी स्नेहसंमेलन

**। म्हसळा । वार्ताहर ।**

महाड येथील वि.ह. परांजपे हायस्कूलच्या १९७१ च्या म्हणजे ११ वीच्या एसएससी बॅचचे स्नेहसंमेलन नुकतेच पार पडले. ५२ वर्ष वयोमान असलेल्या या सत्तरीच्या आजोबा मित्रांचे स्नेहसंमलेन सलग दुसऱ्या वर्षी लाडवली येथील सुधाकर मांडवकर यांच्या हॉटेल अंगणमध्ये तब्बल दोन दिवस पार पडले.



दोन दिवस चाललेल्या या कार्यक्रमांत फक्त सकारात्मक चर्चा ह्या मुख्य हेतूने चर्चात्मक मजा लुटली. एकमेकांनी आपली छोटी-छोटी सकारात्मक गुपिते ज्यांना-ज्यांना आठवणीत येतील, त्यांनी नाट्यमय सादर करायची, असे आवाहन विजय उर्फ बाळू देशपांडे यांनी केले. त्याला सर्वांनी दाद देत ग्रुपमध्ये प्रथमच सामील झालेले बाळू देशपांडे, नितीन दोसी यांनी आणि नंतर नंदा शेठ, सुधीर गंद्रे, दीपक कोटिया, संजय खांबेटे, नंदू मेहता, शेखर वाडकर, विनायक खोडके, अविनाश टक्के, सुशील कद्रू, संतोष वारगे, प्रदीप गांधी, मोहन पाटेकर, सुधीर जाधव, माधव उर्फ पप्पू मुंदडा, दीपक देसाई, निरंजन गुप्ते, शिरीष वारंगे आदींनी भावनात्मक प्रसंग सांगत आपापली मैत्री घट्ट केली.

# सर्वे शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात

**। अलिबाग । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या सर्वे शाळेत शनिवार, दि. जून रोजी प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेच्या पहिल्याच दिवशी नवागतांचे गुलाब पुष्प देऊन व शाळा पूर्वतयारी मेळाव्याचे आयोजन करून स्वागत करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले, तसेच संतोष मोरे मित्रमंडळ यांच्यातर्फे सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.



या कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष विजय कांगणे, उपाध्यक्ष शैलेश जाधव, संतोष मोरे, सरोज दिवेकर, सदस्य नरेश धार्वे, सुशील खोपकर, संतोष सावंत, दीपिका येलकर,जयंता धार्वे, दिपक येलकर, योगेश घोगले, संतोष मित्र मंडळाचे सर्व स्वयंसेवक, अंगणवाडी कर्मचारी, पालक, मुख्याध्यापक राजेंद्र पाटील, सहशिक्षक सूर्यकांत पाटील उपस्थित होते.

# तहसीलदारांची खैरे गावाला भेट

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

महाड तालुक्यातील खैरे गावात दरड कोसळण्याची घटना घडली होती. अगदी पावसाला सुरुवात झाल्यानंतरच हा प्रकार समोर आला होता. त्यामुळे दरडींबाबतची दहशत नागरिकांमध्ये होती. सावंत कुटुंबियांच्या राहत्या घराच्या मागे दरड कोसळल्याने महाडचे नायब तहसीलदार बाबासाहेब भाबड यांनी त्यांची भेट घेतली. सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत व्हावे, अशी सूचना त्यांनी केली.

पावसाला सुरुवात झाल्याने दरडी पडण्याची शक्यता नाकारता येणार नाही. यासाठी नागरिकांनी सुरक्षीत ठिकाणी अथवा गावातील शाळेत स्थलांतरीत होणे गरजेचे आहे. प्रशासन तुमच्या सोबत आहे, आवश्यक असलेल्या सर्व उपाययोजना आणि मजत करण्यात येईल, अशी ग्वाही भाबड यांनी दिली. रायगड जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी दरडी पडण्याची शक्यता अधिक असते.

# चिमुकल्यासह महिलेचा आत्महत्येचा प्रयत्न

## पोलीस, नागरिकांच्या सतर्कतेमुळे वाचला जीव

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल शहर पोलिसांच्या सतर्कतेमुळे व जागरुक नागरिकांमुळे सोमवारी सायंकाळी रेल्वेखाली आत्महत्या करण्यासाठी गेलेल्या एका महिलेसह तिच्या एक वर्षीय मुलाचा जीव वाचविण्यात यश आले आहे.

पती-पत्नीच्या सातत्याने होणाऱ्या भांडणामुळे सदर महिलेने हे टोकाचे पाऊल उचलले होते. नेहमीप्रमाणे आजही सदर महिलेचे आपल्या पतीबरोबर कडाक्याचे भांडण झाले. या भांडणातून तिने पोलिसांशी संपर्क साधला. तात्काळ पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक विवेकानंद शिरसाट, पो.शि. तुकाराम गोडे हे उसर्ली येथे गेले व त्यांनी या दोघांची समजूत काढली तसेच त्यांना पळस्पे पोलीस चौकीत आणून समुपदेशन केले. तरी पण आज संध्याकाळी या दोघांमध्ये पुन्हा भांडण झाल्याने सदर महिलेने याबाबतची माहिती पोलिसांना दिली. त्यानुसार पोलीस तिच्या घरी गेले असता ती घरात आढळून आली नाही. ती आपल्या एक वर्षीय मुलासह कुठेतरी निघून गेल्याचे त्यांना समजले. त्यानुसार या दोन्ही पोलिसांनी तिचा शोध घेण्यास सुरूवात केली. त्यांच्या मदतीला उसर्ली गावातील चेतना म्हात्रे, जयश्री म्हात्रे, संदेश म्हात्रे, विकास मिसाळ, अर्पेश म्हात्रे आदी होते.



सदर महिलेचा शोध घेत असताना ती पनवेल बाजूकडे जाणाऱ्या रेल्वे रुळावर आपल्या लहान मुलासह झोपलेली आढळली. दरम्यान, त्याच वेळेस एक रेल्वे या रुळावर धावत होते. यावेळी सर्वांनी तेथे धाव घेऊन ते रेल्वे थांबविण्याचा प्रयत्न केला. परंतु, रेल्वे थांबेपर्यंत या महिलेच्या शरीरावर ४ ते ५ डबे पुढे गेले होते.

अखेरीस त्या महिलेला सर्वांच्या मदतीने रेल्वे रुळावरुन बाहेर काढण्यात आले व पुन्हा त्यांना पनवेल शहर पोलीस ठाण्यात आणून त्या दोघांमधील वाद मिटविण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक अमोल चौघुले तसेच विवेकानंद शिरसाट व तुकाराम गोडे यांनी विशेष प्रयत्न केले. याबाबत पनवेल शहर पोलीस सदर महिलेला पूर्ण मदत करणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# तौफिकच्या ध्येयाला 'स्वदेस'चे बळ

## आर्थिक मदतीमुळे उच्च शिक्षण घेणे शक्य

**। तळा । वार्ताहर ।**

तळा तालुक्यातील एका सर्वसामान्य कुटुंबातील तौफिक मोहम्मद सईद राहटविलकर याला स्वदेसच्या माध्यमातून आर्थिक मदत करण्यात आली आहे. तौफिकने २०१८ या शैक्षणिक वर्षात डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभियांत्रिकी महाविद्यालय, लोणेरे येथे डिप्लोमा या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्याचा निर्णय घेतला आणि त्याच वेळी स्वदेस फाऊंडेशन संस्थेच्या माध्यमातून उच्च शिक्षणासाठी देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी पात्र होऊन मुलाखतीद्वारे त्याची निवड झाली, तेव्हापासून तौफिकचा स्वदेससोबत प्रवास सुरू झाला आणि स्वदेस फाऊंडेशनने शैक्षणिक खर्चासाठी आर्थिक मदतीला सुरुवात केली.



तौफिकने मध्यमवर्गीय कुटुंबातून असल्यामुळे शिक्षणाला लागणार अवाजवी खर्च करणे हा खूप मोठा अडथळा होता. अशा वेळी स्वदेस फाऊंडेशनने दिलेले आर्थिक स्थैर्य आणि सकारात्मक दृष्टिकोन यामुळे तौफिकने त्याच्या ध्येयाकडे पूर्णपणे लक्ष केंद्रित केले आणि शैक्षणिक वर्ष २०२० मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभियांत्रिकी महाविद्यालय, लोणेरेमध्ये इंस्ट्र्यूमेंटेशन डिप्लोमामध्ये ९७.७ टक्के मिळवून गुण उत्तीर्ण झाला आणि तौफिकने महाराष्ट्र राज्यात दुसरा क्रमांक मिळवला.

त्यानंतर त्याने इन्स्ट्र्यूमेंटेशन आणि कंट्रोलमधील बॅचलर पदवी बीटेक पूर्ण केले. गुणवत्ता आणि आत्मविश्वासाच्या जोरावर कॉलेज कॅम्पस फेरीत हनीवेल ऑटोमेशन इंडिया लिमिटेड नावाच्या यूएसए स्थित मल्टिनॅशनल कंपनीमध्ये ॲप्लिकेशन इंजिनिअरच्या भूमिकेसाठी तौफिकची निवड झाली. सध्या तौफिक हनीवेल मल्टिनॅशनल या कंपनीत पुणे येथे चांगल्या पगाराच्या नोकरीला आहे.

स्वदेस फाऊंडेशनचे संस्थापक रॉनी स्क्रूवाला आणि झरीना स्क्रूवाला तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश वांगे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यातील सात तालुक्यांमध्ये अनेक विकासाची वेगवेगळी कामे होत आहेत. याचबरोबर सन २०१४-१५ पासून आजपर्यंत रायगड आणि नाशिक जिल्ह्यातील ११ तालुक्यांतील इयत्ता १२वीनंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या ५९८ विद्यार्थ्यांना स्वदेसमार्फत आर्थिक मदत करण्यात आली आहे.

**निवडक**

### अपघातास जबाबदार कोण?

**अलिबाग :** तालुक्यातील सहाण बायपास ते कुरुळपर्यंत अनेक ठिकाणी रस्ता खचला असून, सार्वजनिक बांधकाम विभागाने याठिकाणी सिमेंटच्या गोणी भरुन ठेवल्या आहेत. वर्षभरात रस्तादुरुस्तीचा विसर पडलेल्या बांधकाम विभागाला आता जाग आली का, असा सवाल वाहनचालक आणि स्थानिकांकडून विचारला जात आहे. गोणी भरुन ठेवून थातुरमातुर उपाययोजना करण्यापेक्षा कायमस्वरुपी उपाय करणे गरजेचे होते. परंतु, बांधकाम विभागाला त्याचा विसर पडला आहे, अशीच परिस्थिती आहे.

### कांदाबटाटा बाजारात दुर्गंधी

**नवी मुंबई :** पावसाळा सुरू झाला असून, एपीएमसी कांदा बटाटा बाजारात कचऱ्याचे साम्राज्य पसरलेले निदर्शनास येत आहे. ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग आणि दुर्गंधी पाहावयास मिळत आहे. बाजारातील खराब कांदा, पालापाचोळा पडलेला दिसून येत आहे. त्यामुळे याठिकाणी दुर्गंधी पसरून याचा नाहक त्रास येथील व्यापाऱ्यांसह ग्राहकांना होत आहे. याठिकाणी नियमितपणे कचरा उचलला जात नाही, त्यामुळे पावसाळ्यात अशी दुर्गंधी पसरली आहे, येथील सफाई नियमित व्हावी, असे मत व्यापाऱ्यांनी व्यक्त केले आहे.

### वाहतूक कोंडीने त्रस्त

**नवी मुंबई :** सलग तीन दिवस सुट्ट्यांमुळे मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने मुंबई बाहेर पडले होते. त्यामुळे पुणे द्रुतगती मार्गावरील पथकर नाक्यावर शेकडो गाड्या एकाच वेळेस दिसून आल्या. शनिवार रविवार आणि सोमवारी बकरी ईदची सुट्टी आल्याने नागरिक मोठ्या संख्येने घराबाहेर पडले होते. त्यामुळे शीव-पनवेल मार्गावरील वाशी आणि खारघर पथकर नाक्यावर वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. या कोंडीमुळे वाहनचालक त्रस्त झाले होते.

### टॉमेटोच्या दरात वाढ

**नवी मुंबई :** गेल्या चार ते पाच महिन्यांपासून स्थिर असलेले टोमॅटोच्या दराने उसळी घेतली असून, प्रतिकिलो ८० दराने विक्री करण्यात येत आहे. किरकोळ आणि घाऊक बाजारात टोमॅटोचे दर वधारले आहेत. परराज्यातून आणि महाराष्टातून होणारी टोमॅटोची आवक कमी झाल्याने दर वाढले असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. घाऊकमध्ये आधी २०-२४ रुपयांनी उपलब्ध असलेले टोमॅटो आता २८-३२ रुपयांवर पोहोचले आहेत. तर, किरकोळ बाजारात टॉमेटो प्रतिकिलो ८० रुपयांनी विकले जात आहेत.

### महिलेचा विनयभंग

**पनवेल :** आदई येथील पँथर अकादमीतील तरणतलावामध्ये पोहण्यासाठी आलेल्या महिलेचा विनयभंग पोहण्यास शिकविणाऱ्या प्रशिक्षकाने केल्याची घटना घडली आहे. महिला कपडे बदलण्यासाठी खोलीत गेली असता या प्रशिक्षकाने त्याच्याजवळील ॲपल कंपनीच्या मोबाइलच्या सहाय्याने महिलेचा व्हीडीओ काढला. याबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात महिलेच्या तक्रारीनंतर १९ वर्षीय प्रशिक्षक आदित्य फडके याच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

# नगरपरिषद कर्मचारी आक्रमक

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे सेवासुविधा मिळाव्यात यासाठी नगरपरिषद व नगरपंचायत कर्मचारी लढा देत आहे. प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याचे फक्त सरकारकडून आश्वासन देण्यात आले आहे. प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी या कर्मचाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. मंगळवारी (दि. १८) दुपारी अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महाराष्ट्र राज्य नगरपरिषद, नगरपंचायत कर्मचारी व संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीच्या वतीने जिल्हाध्यक्ष राकेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन करण्यात आले.

यावेळी रवींद्र आयनोडकर, नरेंद्र नांदगावकर, प्रकाश आरेकर, राजू पाटील, नरेश काप, सचिन दळवी, सुरेश कासारे, परेश सोळंकी, नामदेव जाधव, विकास मोरे, सचिन घाडगे, प्रेषित वाडकर, मनोज पुळेकर आदी कर्मचारी उपस्थित होते.

कर्मचाऱ्यांना विनाअट सरसकट तातडीने नगरपंचायत सेवेत समावेशन करून कायम कर्मचाऱ्यांना मिळणारे लाभ देण्यात यावेत. सर्व सफाई कामगारांच्या वारसांना लाड कमिटीच्या शिफारशीनुसार, वारसा हक्काचे लाभ देण्यात यावेत, कर्मचाऱ्यांना दहा, वीस, तीसचा लाभ तातडीने लागू करण्या यावा, कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करणे, समान कामाला वेतन देणे, किमान वेतन न देणाऱ्या मुख्याधिकारी, लेखापाल यांना जबाबदार धरून त्यांच्याविरोधात शिस्तभंगाची कारवाई करण्यात, यावी अशा अनेक मागण्यांसाठी नगरपरिषद, नगर पंचायतीचे कर्मचारी अनेक वर्षांपासून शासन दरबारी चपला झिजवत आहे. सरकारकडून फक्त त्या मागण्यांची पूर्तता करण्यासाठी आश्वासन दिले जाते. त्यानंतर प्रलंबित मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप या कर्मचाऱ्यांनी केला आहे. त्यामुळे १८ जून रोजी अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलने करण्यात आले. मागण्यांची अंमलबजावणी तातडीने न झाल्यास येत्या १ जुलैला विभागीय आयुक्त कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण, त्यानंतर ६ ऑगस्ट कामबंद आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदेश शिर्के यांना निवेदन देण्यात आले.



- **अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे**
- **प्रलंबित मागण्यांबाबत सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन**

> प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलन सुरु केले. सरकारचे लक्ष वेधण्यासाठी हा लढा आहे. आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन पुकारले आहे. एक जुलैला विभागीय आयुक्त कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण केले जाणार आहे. तोपर्यंत निर्णय घेतला नाही, तर सहा ऑगस्टला कामबंद आंदोलन केले जाईल. हा लढा न्याय मिळेपर्यंत राहणार आहे. – राकेश पाटील, जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य नगरपरिषद, नगरपंचायत कर्मचारी व संवर्ग कर्मचारी संघर्ष समिती

#### कामबंद आंदोलनाचा इशारा

मागण्यांची अंमलबजावणी तातडीने न झाल्यास येत्या १ जुलैला विभागीय आयुक्त कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण, त्यानंतर ६ ऑगस्ट कामबंद आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला.

#### मुख्यमंत्र्यांना आश्वासनाचा विसर

नगरपरिषद व नगरपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी २० मार्च २०२३ रोजी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत बैठक झाली होती. प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेल्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आले होते. मात्र, त्या निर्णयाची अंमलबजावणी अजूनपर्यंत झाली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे आश्वासनाचा मुख्यमंत्र्यांना विसर पडल्याचे कर्मचाऱ्यांकडून बोलले जात असून, याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली.

# शेतशिवार झाले हिरवेगार

## शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात भाताची शेती खरीप हंगामात प्रामुख्याने केली जाते. गेल्या अनेक दशकांचा अंदाज पाहता मान्सूनची सुरुवात सात जून रोजी होत असते. त्यानुसार भाताचे राब शेतकरी तयार करण्यास घेत असतो. त्यानुसार तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपली राब पेरणीची कामे पूर्ण केली आहे. तालुक्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांनी भाताची पेरणी केली असल्याची माहिती कर्जत तालुका कृषी विभाग यांच्याकडून देण्यात आली आहे. दरम्यान, भाताची रोपे (राब) जमिनीच्या वर आली असून, अनेक ठिकाणी भाताच्या राबामुळे शेतातील काही भाग हिरवागार दिसू लागला आहे.



भाताच्या शेतीचे कोठार म्हणून कधीकाळी कर्जत तालुका ओळखला जात होता. त्यात १९८० च्या दशकात कर्जत तालुक्यात फार्महाऊस सुरु झाले आणि तालुक्यातील भाताचे क्षेत्र कमी झाले. तरीदेखील कर्जत तालुक्यात खरीप हंगामात साधारण दहा हजार हेक्टरवर भाताची शेती केली जाते. तर, उन्हाळ्यात रब्बी हंगामातदेखील किमान दोन हजार हेक्टर जमिनीवर भाताची दुबार शेती केली जाते. मात्र, शेतकरी मे महिन्याच्या अखेरीस भाताची मशागत सुरु करीत असतो. त्यानुसार पहिल्या पावसाची शक्यता लक्षात घेऊन पाच जूनपासून शेतकऱ्यांनी भाताच्या बियाण्यांची पेरणी सुरु केली होती. त्यानुसार भाताचे राब भरणी करण्याचे काम कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांनी पूर्ण केले आहे. त्यामुळे बहुसंख्य शेतकऱ्यांच्या शेतात टाकण्यात आलेल्या भाताच्या बियाणांचे उगवणे प्रक्रिया सुरु असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे बळीराजा खुश असल्याचे दिसून येत आहे.

कर्जत खरेदी विक्री संघ, कर्जत भात संशोधन केंद्र आदी ठिकाणी भात बियाण्यांची विक्री सुरु होती. त्याचवेळी कृषी औषध विक्रेते यांच्याकडेदेखील भाताचे बियाणे उपलब्ध होते. तर काही शेतकरी हे आपल्या शेतामधील भाताच्या पिकातील भातदेखील बियाणे म्हणून ठेवून देत असतात. आतापर्यंत सर्व शेतकऱ्यांनी राब भरणी करून घेतली असून, पेरण्यांसाठी समाधानकारक पाऊस झाल्याने शेतीची कामे वेळेत पूर्ण झाली आहेत. समाधानकारक पाऊस यामुळे बळीराजा समाधानी आहे. आता भाताच्या रोपांसाठी चांगल्या पावसाची गरज असून, शेतकऱ्यांना जोरदार पावसाची ओढ लागली आहे.

## नेरळ कशेळे राज्यमार्ग रस्त्यावर
# कवठेवाडीत झाडांची कत्तल

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात कशेळे-नेरळ राज्यमार्ग रस्त्यावर तेथील एका मोकळ्या जमिनीवरील झाडे अचानक जमीनदोस्त झाली आहेत. त्याबद्दल स्थानिकांनी वन विभागाच्या परवानगीने झाडे तोडण्यात आली असल्याचे बोलले जात असून, त्यातून आलेली माहिती धक्कादायक आहे. त्या ठिकाणी शेतकऱ्यांसाठी असलेली झाडे जमीनदोस्त झाली आहेत. याबाबत वन विभागाने दिलेला परवाना यापेक्षा दुप्पट जमिनीवरील झाडांची कत्तल करण्यात आली आहे. तरीदेखील जंगलतोड करणाऱ्या ठेकेदारावर वन अधिकाऱ्यांकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. दरम्यान, अशा वन अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी यासाठी जिल्हा उप वनसंरक्षक यांच्याकडे तक्रार करण्याची तयारी पर्यावरणप्रेमींकडून सुरु आहे.



मुळात, कवठेवाडी येथील आदिवासी शेतकऱ्याला आपल्या जमिनीमधील झाडांची तोड कोणत्याही कामासाठी करायची नव्हती. मात्र, वन विभागाच्या त्या ठेकेदाराने संपूर्ण नऊ एकरमधील जमिनीवरील झाडे तोडून टाकली आहेत. कर्जत वनक्षेत्र अधिकारी यांच्याकडून ठेकेदारावर कारवाई केली जात नाही. त्यामुळे कर्जत तालुक्यातील अशा जंगलतोडीबद्दल जिल्हा उपवन संरक्षक यांच्याकडून कारवाई व्हावी या मागणीसाठी आता पत्रव्यवहार करण्याचा निर्णय स्थानिकांनी घेतला आहे. तर, कर्जत प्रेस असोसिएशनकडून जिल्हा उप वनसंरक्षक यांना पत्र देऊन कर्जत तालुक्यातील संपूर्ण जंगलतोड प्रकाराची चौकशी करण्याची मागणी केली जाणार आहे.

> संबंधित आदिवासी मालकी जमिनीतील जंगलतोड झालेला माल साठवून ठेवण्यात आला आहे. त्या मालाची विक्री करण्याची परवानगी आम्ही जिल्हा कार्यालयाकडे मागितली आहे. ती परवानगी आल्यावर मालाचा लिलाव केला जाईल. – रमेश चव्हाण, वनक्षेत्रपाल, कर्जत

- **नऊ एकरातील झाडे जमीनदोस्त**
- **जमीन सपाट करण्यासाठी हा उद्योग**

### वैश्य समाज माहेरवासिनींचा मेळावा उत्साहात

**। चौक । वार्ताहर ।**

महिला म्हटले की त्यांना आवडणारा कार्यक्रम हळदी कुंकू, संगीत खुर्ची किंवा आता नव्यानेच प्रसिद्धीस आलेल्या पैठणीचा कार्यक्रम होय. दिवसभराच्या कामातून वेळात वेळ काढून पनवेल येथील वैश्य समाजाच्या वतीने माहेरवाशीन झालेल्या व नव्याने सासरी आलेल्या महिलांनी रविवार, दि. १६ रोजी मेळावा आयोजित केला होता. त्यात प्रामुख्याने विविध कलागुणांचे खेळ, संगीत, वेग वेगळ्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात रंग भरण्यासाठी स्नेहल मनोरे यांनी सूत्रसंचालनाची धुरा सांभाळली होती. स्पर्धेचे नियोजन प्राची दबके यांनी केले. माहेरी आलेल्या प्रत्येक स्त्रीच्या चेहऱ्यावर आईकडे आल्याने जो आनंद मिळतो, तो पहावयास मिळत होता. अनेक कलागुणांची उधळण माहेरवासिनींनी केल्यानंतर परत घरी जातेवेळी जशी आई आपल्याबरोबर काही खाऊचा डबा बांधून देते, त्याप्रकारे प्रत्येक माहेरवासिनीला मिठाईचा बॉक्स देण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी प्राची शेटे, वैशाली बडे, भारती अंग्रे, स्नेहा तांबोळी, मेघा मलबारी, शुभांगी शेटे यांनी मेहनत घेतली.

## रस्त्यासाठी आणलेले पाईप पडूनच



- **ठेकेदाराची काम करण्यास टाळाटाळ**
- **नागरिकांवर खड्डेमय रस्त्यावरुन प्रवासाची वेळ**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील नांदगाव ग्रामपंचायतीमधील मुख्य रस्त्याच्या कामासाठी पाईप आणण्यात आले आहेत. मात्र, रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराकडून कोणतेही काम करण्यात आले नाही आणि त्यामुळे या पावसाळ्यात येथील रस्त्याची शक्यता कमी असून, पावसाळ्यात खड्डेमय रस्त्याने प्रवास करण्याची वेळ आली आहे.

नांदगाव गावातून बलीवरे गावाकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम करण्यासाठी निधी मंजूर आहे. त्यासाठी तेथे रस्त्यात नवीन पाईप मोरी बनवण्यासाठी सिमेंट पाईपदेखील आणून टाकण्यात आले आहेत. मात्र, रस्त्याचे काम सध्या खड्डेमय असून, रस्त्याची दुरुस्ती आणि नूतनीकरण करण्याची गरज आहे. त्यासाठी बांधकाम खात्याकडून रस्त्यावरील कामे केली जाणार आहेत. त्यात नांदगावच्या पुढे न्हाणी नदीच्या अलीकडे जुन्या मोरीचे पाईप काढून नवीन पाईप टाकण्यासाठी पाईप आणण्यात आले आहेत. मात्र, पावसाळा सुरू झाल्याने ते पाईप तसेच शेतात पडून आहेत. ज्या शेतात ते पाईप टाकण्यात आले आहेत, त्या शेतजमिनीचे मालक यांनादेखील शेती करण्यात अडचणी येणार आहेत.

## डाक अधीक्षकांच्या प्रेरणेमुळे कर्मचाऱ्यांचे रक्तदान

**। सारळ । वार्ताहर ।**

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, सैनिकाप्रमाणे आपणास प्रत्यक्ष देशसेवा करता येत नसली तरी रक्तदानातून आपल्या देशवासियांची आपण उत्तम सेवा करू शकतो, अशी महती डाक अधीक्षक सुनील थळकर यांनी कर्मचारीवर्गास सांगत जागतिक रक्तदान दिनानिमित रक्तदान करण्याचे आवाहन केले. अधीक्षकांच्या प्रेरणेमुळे १३ डाक कर्मचाऱ्यांनी स्वेच्छेने जिल्हा रुग्णालयामधील रक्तपेढीत जाऊन रक्तदान केले. यात महिला व मुलींचाही सहभाग होता. या अभियानात सरिता म्हात्रे, निशा रांनी, एकता श्रीवास्तव, तमन्न यादव, मनोज अंबुरे, नागेश शैला साखरकर, मयूर जेन, मनीष दगुर, राजीव रंजन, राजीव पॉल, गजेंद्र सिंह, सुभाष कुमार यांनी रक्ततदान केले.






● नवीन पनवेलमधील गाढी नदी प्रदूषणाच्या विळख्यात सापडली असून, मोठ्या प्रमाणात प्लास्टिक बाटल्या आणि कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. नदी संवर्धनाची मोहीम हाती घेतलेल्या प्रशासनाला गाढी नदीच्या स्वच्छतेचा विसर पडलेला दिसून येत आहे. (छायाचित्र : राजेश डांगळे)

## पाटणसई येथे वृक्षारोपण

**। सुकेळी । वार्ताहर ।**

प्रदूषणाच्या समस्येने सर्वत्र उग्र रुप धारण केलेले असून, पर्यावरणाचे रक्षण करणे आवश्यक झाले आहे. यासंबंधी समाजाला जागृत करण्यासाठी व समाजामध्ये वृक्षारोपण व संवर्धनासाठी जनजागृती करण्यासाठी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्यानुसार पाटणसई येथील मोरया होम टाऊनच्या परिसरामध्ये रविवारी (दि.१६) वृक्षारोपण करण्यात आले.



पावसाळा सुरू होण्याच्या सुरुवातीलाच व जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत नागोठण्याजवळच असलेल्या पाटणसई येथील मोरया होम टाऊन येथील रहिवाशांनी मोरया टाऊनच्या परिसरामध्ये वेगवेगळ्या झाडांची लागवड करुन सर्वांना वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचा संदेश दिला. यावेळी वृक्षारोपणसाठी विश्वास गायकर, सुनील थळे, स्वप्निल जांबेकर, चेतन जाधव, आराधना गायकर, रिया जांबेकर, वैशाली गायकवाड, स्नेहा थळे, सविता जाधव आदी रहिवासी उपस्थित होते.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **बोअरवेल-विहिरीसाठी** मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९
- **सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये** स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय २५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६
- **अलिबाग येथे हॉस्पिटलमध्ये कामासाठी** पुरूष कर्मचारी पाहिजेत. योग्य पगार दिला जाईल. डॉ.सरोज तांबोळी मेमोरिअल हॉस्पिटल-रामनाथ. डॉ. अतुल कोतेकर- ७७९८८८०७०४, प्रिया कर्णिक-९३७२२०४९७०
- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता** आहे. १. वेटर, २. नाश्ता बनवणारा कूक, ३. हाऊस कीपिंग, २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा. (व्हॉटसॲप वर मेसेज करावा.) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५
- **हार्डवेअर दुकानात मांडवा येथे मुलगी कामाला पाहिजे.** मो. ८००७८९३२३२, ९४२१९५४३४८
- **५०००० रुपये किंमतीचा** CNC मशिन ऑपरेटींगचा कोर्स मोफत, मोफत, मोफत, पात्रता १२ वी किंवा १५ वी पास, वयोमर्यादा-३० वर्षे पर्यंत. पगार- १०००० रुपये, ८ तास ड्युटी, संपर्क- ९०४९६५५५२३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## मुठे विक्रीतून हक्काच्या रोजगाराची निर्मिती
# गावरान मुठ्यांच्या खरेदीसाठी खवय्यांची गर्दी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**समुद्रातील मासेमारी बंद झाल्यामुळे चिकन व मटण याचे भावदेखील वाढले आहेत. पाऊसदेखील काही दिवसांपूर्वी सुरु झाला आहे. अशावेळी नव्याने बाहेर पडणारे मुठे (चिंबोऱ्यांची एक जात) खवय्यांना आकर्षित करत आहेत. कोवळ्या गवतावर आणि पावसाच्या सुरुवातीलाच मिळणाऱ्या पौष्टिक आणि चविष्ठ मुठ्यांना मागणी वाढत आहे.**

पाऊस पडल्यावर हिरवळ उगवू लागते आणि ते हिरवळ चार म्हणून खाण्यासाठी वर्षातील आठ महिने बिळामध्ये लपून बसलेले मुठे बिळातून बाहेर येतात. प्रामुख्याने रात्रीच्या वेळी हे मुठे बिळातून बाहेर येतात. तर, पाऊस पडत असल्यावर जास्त संख्यने मुठे चारा खाण्यासाठी बाहेर पडतात आणि त्या मुठ्यांना पकडले जाते. रात्रीच्या वेळी



रिमझिम पाऊस पडू लागल्यावर मुठेपकडण्यासाठी खवये बाहेर पडतात. हातात गॅसबत्ती, टॉर्च किंवा जळता टायर घेतला जातो, सोबत मुठे ठेवण्यासाठी सिमेंटची पोती किंवा गोणपाट असतो. रात्रभर माळरान, शेत, गवताळ भाग किंवा डोंगर उतारावर फिरून मुठे पकडले जातात.

बत्तीच्या किंवा टॉर्चच्या उजेडात हे मुठे थांबतात, मग आपण दबक्या पावलाने जाऊन त्यांना पकडून पोत्यात टाकले जाते. बऱ्याच वेळ फिरूनसुद्धा काही वेळेस मुठे हाती लागत नाही. त्यासाठी निसर्गाची साथ असावी लागते.

इतर खेकड्यांपेक्षा आकाराने लहान असलेल्या मुठ्यांचा रंग तजेलदार काळा व पिवळा असतो. पाठीचा भाग थोडा गोलाकार वर आलेला असतो. आकाराने लहान असले तरी त्याचे मांस चविष्ठ व आरोग्यवर्धक असते. मुठे वेगवेगळ्या प्रकारे आणि पद्धतीने बनवून खाल्ले जातात. त्यातील सर्वात प्रसिद्ध पद्धत म्हणजे मुठ्यांचे कवच काढून त्यामध्ये तांदूळ किंवा चण्याच्या पिठाचे मिश्रण भरले जाते. हे मिश्रण भरल्यावर धाग्याने पुन्हा कवच बांधून कालवण तयार केला जातो. हे भरलेलं मिश्रण चविष्ठ आणि लज्जतदार लागते. वाढते प्रदूषण, शहरीकरण व बांधकामे यामुळे मुठ्यांची निवासस्थाने नष्ट होत आहेत. तसेच पावसाचा अनियमितपणा या कारणामुळे प्रजोत्पादन कमी होऊन मुठ्यांची संख्या घटत आहे, अशी भीती खेकडे अभ्यासक नचिकेत घरत व्यक्त करतात.

#### डझनाला १०० रुपये भाव

सध्या मुठ्यांचा बाजारभाव एक डझनला (१२ मुठे) १००/– रुपये असल्यामुळे अनेक जण पकडणे पसंत करतात. मुठे विकून अनेकांच्या हातालादेखील दोन पैसे मिळतात. पावसाळ्याच्या सुरुवातीला मिळणाऱ्या या मुठ्यांवर खवये तुटून पडतात. मुंबई, पुणे आदी शहरांमध्ये राहणारे लोक गावाकडून हमखास मुठे नेतात किंवा आणायला सांगतात. पावसात उगवलेले कोवळे गवत तसेच शेतामध्ये पडलेले भाताचे दाणे खाण्यासाठी बाहेर पडतात. रात्रीच्या वेळीच रिमझिम पावसात हे मुठे आपल्या नांग्यांनी गवत तोडून बिळात नेऊन निवांतपणे खातात.

# सात फुटी अजगराला जीवदान

**। सोगाव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील सोगाव येथे रामधरणेश्वर डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या एका घराच्या पडवीत शुक्रवारी (दि.१४) रात्री साडेअकराच्या सुमारास एक भला मोठा अजगर आला होता. यावेळी घरात पती-पत्नी व तिची दोन लहान मुले होती. घराबाहेर पडवीत भला मोठा सर्प पाहून ते घाबरून गेले. त्यांनी आरडाओरडा केला असता शेजारी धावून आले.

यावेळी तुडाळ येथील सर्पमित्र प्रसाद पाटील यांच्याशी संपर्क साधण्यात आला. प्रसाद पाटील यांनी आपला सर्पमित्र सिध्दांत पाटील यांच्यासह घटनास्थळी दाखल झाले, त्यांनी तब्बल ७ फूट लांब व अंदाजे १३ किलो वजन असलेल्या महाकाय अजगराला आपल्या कौशल्याने पकडून जीवनदान दिले. यामुळे सर्पमित्र प्रसाद पाटील व सिध्दांत पाटील यांचे सर्वस्तरांतून कौतुक होत आहे.



---

**जाहीर नोटीस**
**महसूल व वन विभाग**
**अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव यांचे कार्यालय कचेरी रोड, माणगांव, ता.माणगांव, जि.रायगड**
Email ID : altmangaon@gmail.com

**जाहीर नोटीस** दावा क्रमांक: ४८/२०२४

प्रति,
१. श्री. भावेश दिलीप म्हस्के — वादी
रा.मुगवली ता.माणगांव जि. रायगड

विरुध्द

१. श्रीम. द्रोपदी हिरामण
रा. मुगवली ता.माणगांव जि. रायगड — प्रतिवादी

ज्याअर्थी, अर्जदार (कुळ) यांची महाराष्ट्र कुळ कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ३२ (ग) अन्वये अनुसुचीमध्ये नमुद केलेल्या आणि कुळ म्हणून धारण केलेल्या जमिनी खरेदी करण्याची इच्छा आहे. आणि त्यासाठी जमिनीची खरेदी किंमत ठरवुन मिळण्यासाठी न्यायधिकरणाकडे दावा अर्ज दाखल केलेला आहे. आणि ज्याअर्थी न्यायाधिकरणाने कुळकायद्याच्या तरतुदीनुसार जमिनीची किंमत निर्धारित करण्याचे योजिले आहे.

त्याअर्थी सदर दाव्याची सुनावणी दिनांक २४/०६/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता नेमण्यात आली आहे. तरी सदर तारखेस अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव, जि. रायगड येथे स्वतः वकील अथवा प्रतिनिधीमार्फत न्यायाधिकरणापुढे हजर राहुन बाजु मांडण्याविषयी याद्वारे फर्माविण्यात येत आहे.

जर कोणतीही व्यक्ती, न्यायाधिकरणाची आगाऊ लेखी परवानगी घेतल्या वाचुन नेमलेल्या तारखेस व वेळी न्यायाधिकरणापुढे हजर राहण्यास कसुर करील, तर त्या बाबीसंबंधी तीस काहीही सांगावयाचे नाही असे समजण्यात येईल. व तिच्या गैरहजेरीत चौकशीचे काम पुढे चालवुन न्यायाधिकरण योग्य तो आदेश पारीत करील, याची नोंद संबंधितांनी घ्यावी.

**अनुसुची**

| गावाचे नांव | स.न. | एकूण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| मुगवली ता.माणगांव | ६/४ | ०-४४-७० | ०-२२ |

ठिकाण:- माणगांव
दिनांक:-१८/०६/२०२४

सही/-
**(विकास गारुडकर)**
**अपर तहसीलदार व**
**शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव**

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेल्या शेती मिळकतीमधील विद्यमान मालक १) श्री. प्रकाश मधुकर पाटील २) श्रीमती मालती मधुकर पाटील रा. खारगल्ली पो. नागाव ता. अलिबाग, जि. रायगड ३) सौ. शुभांगी हरिश्चंद्र मोकल रा. न्यू पनवेल ता.पनवेल जि. रायगड यांचा अविभाज्य हिस्सा असून त्यामधील अंशःता हिस्सा हा विद्यमान मालक याच्याकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला असून तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांनी आमचे अशिलाना करून दिलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| नागाव ता. अलिबाग | १२४४ | ०-२७-३०<br>पो.ख. ०-००-५०<br>एकूण ०-२७-८० | ७.०६ |

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीमधील विद्यमान मालक यांचा अविभाज्य हिश्यामधील अंशःता हिश्या हा या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख १८/०६/२०२४

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर
पो. अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड.

---

**जाहीर नोटीस**
**महसूल व वन विभाग**
**अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव यांचे कार्यालय कचेरी रोड, माणगांव, ता. माणगांव, जि.रायगड**
Email ID : altmangaon@gmail.com

**जाहीर नोटीस** दावा क्रमांक: ५१/२०२४

प्रति,
१. श्री. नथुराम भिकु बामणोलकर — वादी
रा. वडगांव ता.माणगांव जि.रायगड

विरुध्द

१. श्री. सहादेव कुशा बामणोलकर २. श्री. रमेश कुशा बामणोलकर — प्रतिवादी
३. श्री. गणु येटु बामणोलकर ४. श्री. संदीप लक्ष्मण बामणोलकर
५. श्रीम. लक्ष्मी लक्ष्मण बामणोलकर
सर्व रा. वडगांव ता.माणगांव जि.रायगड

ज्याअर्थी, अर्जदार (कुळ) यांची महाराष्ट्र कुळ कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ३२ (ग) अन्वये अनुसुचीमध्ये नमुद केलेल्या आणि कुळ म्हणून धारण केलेल्या जमिनी खरेदी करण्याची इच्छा आहे. आणि त्यासाठी जमिनीची खरेदी किंमत ठरवुन मिळण्यासाठी न्यायधिकरणाकडे दावा अर्ज दाखल केलेला आहे. आणि ज्याअर्थी न्यायाधिकरणाने कुळकायद्याच्या तरतुदीनुसार जमिनीची किंमत निर्धारित करण्याचे योजिले आहे.

त्याअर्थी सदर दाव्याची सुनावणी दिनांक २४/०६/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता नेमण्यात आली आहे. तरी सदर तारखेस अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव, जि. रायगड येथे स्वतःवकील अथवा प्रतिनिधीमार्फत न्यायाधिकरणापुढे हजर राहुन बाजु मांडण्याविषयी याद्वारे फर्माविण्यात येत आहे.

जर कोणतीही व्यक्ती, न्यायाधिकरणाची आगाऊ लेखी परवानगी घेतल्यावाचुन नेमलेल्या तारखेस व वेळी न्यायाधिकरणापुढे हजर राहण्यास कसुर करील, तर त्या बाबीसंबंधी तीस काहीही सांगावयाचे नाही असे समजण्यात येईल. व तिच्या गैरहजेरीत चौकशीचे काम पुढे चालवून न्यायाधिकरण योग्य तो आदेश पारीत करील, याची नोंद संबंधितांनी घ्यावी.

**अनुसुची**

| गावाचे नांव | स.न. | एकूण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु. पैसे) | प्रकार |
|---|---|---|---|---|
| वडगांव ता.माणगांव | १५८/३ | ०-२६-०० यापैकी ०-०६-०० | ०-४७ | भात |

ठिकाण:- माणगांव
दिनांक:- १८/०६/२०२४

सही/-
**(विकास गारूडकर)**
**अपर तहसीलदार व**
**शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव**

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

खालील वर्णनाच्या जमीन मिळकतीचे विद्यमान मालक सौ.ताराबाई किसन नाखवा रा. उरण यांचेकडून सदर खालील वर्णनाची जमीन मिळकत आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**गाव येसदे येथील मिळकतीचे वर्णन :-**

| गाव | भुमापन क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र हे. आर | आकारणी रू. पै | लागवड |
|---|---|---|---|---|
| येसदे | १२/१/ब/१ | ०.३५.४० | ३.२३ | भात |

वरील नमुद मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा करून घेण्याकरीता सदरची नोटीस देण्यात येत आहे. तरी देखील या मिळतीमध्ये इतर कोणाचेही गहान दान, लिज, फरोक्त, भागीदार, बक्षिस, मृत्यूपत्रांकित दान, तावेकब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी, हक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तसेच या मिळकतीबाबत कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालु असल्यास अथवा या व्यवहाराला कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांत लेखी स्वरूपात पुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी या मुदतीमध्ये कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून आमचे अशिल खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकतीचे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत कागदोपत्री पुरावा न जोडलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १८/०६/२०२४

सही/-
**ॲड. सचिन दत्तात्रेय पाटील**
मु.येसदे, पो.वळके, ता.मुरूड, जि.रायगड.

---

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

---


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग*
*दागिने-नविन डिझाइन्स*



मोल्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक नामदेव गणपत मोरे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे जांमरुंग, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| जुना सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर १२६/५<br>नवीन सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर ६२/५ | एकुण ०-२४-००<br>हे आर पॉ | ०-१७ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमात्रा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुद्रतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १९/०६/२०२४
**ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
**ॲड. वृषाली रघुनाथ मोरे** मोबा. ८५३०१४३८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीबारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक अविनाश वसंत केलटकर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे - मोठे वेणगाव, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ७१/३ | एकुण ०-५५-०० हे आर पॉ<br>यापैकी क्षेत्र ०-१६-०० हे आर पॉ | ९-७५ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमात्रा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १९/०६/२०२४
**ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
**ॲड. वृषाली रघुनाथ मोरे** मोबा. ८५३०१४३८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि.रायगड)
**जाहिर नोटीस**

ज.म.र. अर्ज ३४/२०२४

प्रति,
श्रीम. जना हरि मोकल
रा. खारआंबोली, ता. मुरुड — अर्जदार
जि. रायगड

विरुध्द

ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत आंबोली, — सामनेवाला
ता.मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार श्रीम. जना हरि मोकल यांचा दिर कै. गोविंद धर्मा मोकळे यांचा मृत्यु दि.१०/०४/१९८५ रोजी राहत्या घरी मौजे खारआंबोली, ता. मुरुड-जंजिरा जि.रायगड येथे झाला आहे. त्यांच्या मृत्युची नोंद ग्रुप ग्रामपंचायत आंबोली कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे मृत्यु नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, कै. गोविंद धर्मा मोकल यांचा मृत्यू दि. १०/०४/१९८५ रोजी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयांत दि. १६/०७/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये मृत्युची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ११/०६/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता.मुरुड जि. रायगड)
जाहिर नोटीस — ज.म.र अर्ज ३३/२०२४

प्रति,
श्रीम. जना हरि मोकल
रा. खारआंबोली, ता. मुरुड — अर्जदार
जि. रायगड

विरुध्द

ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत आंबोली, — सामनेवाला
ता.मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार श्रीम. जना हरि मोकल यांचा सासरे कै. धर्मा बारक्या मोकल यांचा मृत्यु दि. १७/०८/१९७५ रोजी राहत्या घरी मौजे खारआंबोली, ता. मुरुड-जंजिरा जि.रायगड येथे झाला आहे. त्यांच्या मृत्युची नोंद ग्रुप ग्रामपंचायत आंबोली कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे मृत्यु नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, कै. धर्मा बारक्या मोकल यांचा मृत्यु दि. १७/०८/१९७५ रोजी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयांत दि.१६/०७/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये मृत्युची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ११/०६/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, आमचे अशिल १) श्री. यशवंत बाजीराव जोशी, रा. डोंबिवली (पुर्व), २) श्री. मोरेश्वर बाजीराव जोशी, रा. श्री. समर्थ हौसींग सोसा. पहिला मजला पोष्ट ऑफिस जवळ, कर्जत- ४१०२०१. ३) सुशिला अनंत बाम, रा. मु. पो. दहिवली, कर्जत, रायगड- ४१०२०१ ४) रोहिनी विजय जोशी, रा. डोंबिवली (पश्चिम),४२१२०१, ५) केदार रामचंद्र जोशी, रा. तिवरे, ता. कर्जत जि. रायगड, ६) सौ.धनश्री धनंजय वैदय, रा. बी/४ अतिश कॉम्पलेक्स, आनंद नगर, पुणे- ४११००५. ७) श्री. श्रीपाद अभय सहस्त्रबुध्दे रा. श्रीकृष्णनगर, शिवगर, आपटेवाडी, बदलापुर, ता. आंबरनाथ, जि. ठाणे. ८) सौ. रुपाली सचिन खेडकर, ९) श्री. ऋषीकेश वामन नाटेकर, १०) अनघा उमेश सहस्त्रबुध्दे, ११) सौ. आरती प्रसाद दिवेकर, १२) सौ. कविता अनिल काळे, १३)अनिता अशोक खोपकर, १४) अरुणधती जयंत नगरकर १५) दिलीप दत्तात्रय जोशी, १६) श्रीमती रजनी रविन्द्र लोंढे १७) सौ. मनाली धनंजय वैदय, १८) सौ. मनाली मकरंद आमडेकर, १९) सौ. स्वाती शेखर फाटक, रा. ३४ वेलणकर कॉलनी, लक्ष्मीनारायण थिएटरजवळ, पर्वती (स्वारगेट), पर्वती- ४११००९. यानी व मौजे खांडस मधील सर्व्हे नं. १९६ ( जुना सर्व्हे नं. ४१०) यांसी क्षेत्र २१७.९० हेक्टर जमीन व मौजे आंभेरपाडा मधील सर्व्हे नं. १२१ यांसी क्षेत्र ३८५.१८ हेक्टर जमीनीचे मालक आहेत. या जमीनीबाबत कामकाजा करीता १) श्री. महादेव श्रीकांत आंबेकर, रा. ए/५, मधुकमल सोसायटी, सर्वे नं. ११९/२, पौड रोड, वनाज फॅक्टरी जवळ, कोथरुड, पुणे- ४११०३८. २) श्री. तेजस विनोद दोशी, रा. बिल्डींग नं. ५, चंद्रलोक सी.एच.एस.एल. शिवाजीनगर, पुणे- ४११०१६. यांना दिनांक १६ मार्च २०२२ कुलमुखत्यारपत्र लिहुन दिलेले आहे. तसेच मौजे तिवरे, सर्व्हे नं. ९/३, यांसी क्षेत्र ०४ हेक्टर ७८ आर या करीता १) श्री. गोविंद जनार्दन पानगांवकर, रा. फ्लॅट नं. १३, सुयश सी.एच.एस. एल, तळेगांव, ता. मावळ, जि. पुणे- ४१०५०७. व २) श्री. तेजस विनोद दोशी, रा. बिल्डींग नं. ५, चंद्रलोक सी.एच.एस.एल. शिवाजीनगर, पुणे- ४११०१६. यांना व दिनांक २१ एप्रिल २०२२ हे रोजी कुलमुखत्यारपत्र लिहुन दिलेले होते. आमच्या अशिलांनी वरील नमुद इरामांचे कुलमुखत्यारपत्र रद्द केलेले आहेत. सबब वर नमुद जमीनीबाबत मालकांव्यातिरिक्त सदरील इसमांबाबत व्यवहार करु नये. सदरील व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कोणाचेही नुकसान होउ नये म्हणुन चांगल्या समजुतीने सदरची नोटीस देत आहे. कळावे.

पुणे
दिनांक-१६/०६/२०२४

ॲडव्होकेट
**बबन सुदाम वाघमळे**
पत्ता- सं.न. २०, भालेकर नगर, मु.पो. पिंपळे गुरव,
ता. हवेली. जि. पुणे- ४११०६१.

---

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे कार्ले, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. भालचंद्र गोविंद भगत वगैरे रा. कार्ले, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली भातशेती मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कार्ले ता. अलिबाग | ८४ | ०-२९-६० | ४.२५ |

सबब सदरहू जमिन मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १८/०६/२०२४

सही / -
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

---

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चौल दक्षिण भाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. रमण पांडुरंग घरत, रा. साई को. ऑप. हौ. सोसायटी, रेवदंडा, सिव्हील हॉस्पीटल शेजारी, पो. रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली बागायत मिळकत माझे स्नेही श्री. विश्वनाथ सिताराम पाटील, रा. मु.पो. सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | जु.स.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| चौल द. भाग ता. अलिबाग | २६४५ | <br>पो.ख.<br>एकूण | ०-२९-३०<br>०-०२-८०<br>०-३२-१० | १६.३१ |

या मिळकतीपैकी ०-०६-१० हे. आर. मिळकतीबाबत.

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २८/०५/२०२४

सही /
**जयवंत दत्तात्रेय म्हात्रे**
पत्ता : रा. थेरोंडा (धाकलीवाडी), पो. चौल
ता. अलिबाग, जि. रायगड.

---

**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वनविभाग**
तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय, तळा जि.रायगड
दुरध्वनी क्रमांक - ०२१४०-२६९३१७ फॅक्स- २६९०४२
Email ID -tahasiltala@gmail.com

क्र.प्रशासन कात-५/जन्म-मृत्यू/जाहिर नोटीस/१९१३/२०२४ दि.१२/०६/२०२४

**जाहिर नोटीस मसुदा**

१.श्री. रफिक दाऊद कागदी — अर्जदार
मु.मजगांव ता. तळा जि. रायगड

विरुध्द

१.निबंधक जन्म-मृत्यू वविवाह नोंदणी अधिकारी. — सामनेवाला
ग्रामपंचायत मजगांव
२. गटविकास अधिकारी पंचायत समिती तळा

तमाम जनतेस या जाहिर नोटीस अन्वये कळविण्यात येते की. सदरहू अर्जदार यांची मुलगी फरहत रफिक कागदी हिचा जन्म दि.१७/०५/१९९१ रोजी मौजे मजगांव ता. तळा, जि. रायगड येथे जन्म झाला असून त्यांचे जन्म नोंद सामनेवाल्यांचे कार्यलयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दि.१८/०४/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये यांची मुलगी फरहत रफिक कागदी हिचा जन्म दि. १७/०५/१९९१ रोजी मौजे मजगांव रोजी जन्म झाला असल्याचे घोषीत करुन जन्म दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे अथवा हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

सबब विहीत मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदार यांची मुलगी फरहत रफिक कागदी हिचे जन्म नोंदबाबत सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि.१२ जून २०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.

सही/-
**(मंगेश पालांडे)**
**कार्यकारी दंडाधिकारी तळा**

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलानी मौजे चरी ता. अलिबाग, जि. रायगड येथील, भूमापन क्रमांक व उपविभाग ४७, खराब्यासह एकुण क्षेत्र ०-५७-६० (हे.आर.पॉ.) आकार ८.०० (रू.पै.) या मिळकतीपैकी निशिकांत रघुनाथ पाटील यांचे मालकीची, खराब्यासह क्षेत्र ०-०२-०० (हे. आर. पॉ.), आकार ०.१६ (रू.पै.) ही मिळकत, विद्यमान मालक श्री. निशिकांत रघुनाथ पाटील यांचेकडून कायम घेण्याविषयी ठरविले आहे व त्या अनुषंगाने विद्यमान मालकांनी बयाणा रक्कम स्विकारली आहे.

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असलेबाबत तसेच प्रत्यक्ष ताबे कब्जात असलेबाबत विद्यमान मालकांचे म्हणणे आहे.

तरीही वर वर्णन केलेल्या मिळकतीचे संदर्भात कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबध, मालकी, गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षीस, ताबा, जाण्यायेण्याचा हक्क, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह नोटीस प्रसिध्द झालेपासून पंधरा दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे आपली लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत तशा प्रकारची हरकत न आल्यास वर नमुद मिळकतीत कुणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही, व मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागावून आलेली तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक: १८/०६/२०२४

**(ॲड. महेश एकनाथ घरत)**
'गुरूकृपा' मु.पो. खंडाळे,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८२२६३५५१२

---

## नोटीस

दिनांक १९/०६/२०२४

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथिल मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. बळवंत धोंडू रणदिवे यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/ गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भूमाप क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चौल ता. अलिबाग | २१२५ | बागायत ०-०५-५०<br>पो.ख. ०-००-१०<br>**एकूण ०-०५-६०** | २.१५ |

दिनांक :- १९/०६/२०२४

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल रुबीना अमजद अली शेख, यांनी खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत विद्यमान मालकांकडून विकत घेणे करीता ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-मौजे-कळंब, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. | आकार पै. |
|---|---|---|---|---|---|
| १) अरशद सिकंदर मसते,<br>२) सिमाब सिकंदर मसते,<br>३) शाहीद सिकंदर मसते, | १४४ | ५ | ०.२१.२० | ०२ | ६९ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र,, चार्ज व गैर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार वकील यांचे कडे ही नोटीस प्रसिध्द झाल्या पासून १५ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हित संबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हित संबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधन कारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दि. १८/६/२०२४

**मनोज किसन क्षिरसागर** (ॲडव्होकेट)
मु. सम्राटनगर, पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
पिनकोड ४१०१०१

निवडक

### महिलांचा सन्मान

**रायगड :** महाराष्ट्र प्रिमियर लिग हि महाराष्टातील एकमेव टी-२० क्रिकेट लिग स्पर्धा आहे ज्याची सुरवात महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्यावतीने करण्यात आली. महाराष्ट्रातील महिलांच्या यशाचा उत्सत्व साजरा करण्यासाठी एमपीएलने 'औरत है तो भारत है' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हा कार्यक्रम शनिवारी पुण्यातील आंतरराष्ट्रीय मैदानावर मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी राज्यातील विविध भागांतील ५ हजारहुन अधिक महिलांनचा सन्मान करण्यात आला.

### स्टार खेळाडूची निवृत्ती

**फ्लोरिडा :** नेदरलँड्‌सचे टि-२० विश्वचषकातले आव्हान संपल्यानंतर त्यांचा स्टार खेळाडू सायब्रँड एंजलब्रेक्टने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. दक्षिण आफ्रिकेत जन्मलेल्या सायब्रँडने तिथेच क्रिकेटचे धडे घेतले. तो दक्षिण आफ्रिकेकडून २००८ साली झालेल्या १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेतही खेळला. या स्पर्धेतही त्याने त्याच्या क्षेत्ररक्षणाने सर्वांचे लक्ष वेधले होते. परंतु, यापुर्वी त्याला क्रिकेटमध्ये फारशी मोठी संधी मिळाली नाही.

### पावसामुळे आयसीसी गोत्यात

**फ्लोरिडा :** अमेरिकेत क्रिकेटच्या प्रसारासाठी आयसीसीने टी-२० विश्वकरंडक स्पर्धेचे न्यूयॉर्क आणि फ्लोरिडा येथे काही सामने आयोजित केले. परंतु, फ्लोरिडात भारत-कॅनडा सामना पावसामुळे रद्द झाला आणि त्याचे परिणाम कदाचित आयसीसीला भोगावे लागू शकतात. सामना झालाच नाही तर तिकिटांचे पैसे परत करा, असा आग्रह धरण्यात आला आहे. तर, पैसे परत दिले नाहीत तर न्यायालयात खेचू, असा इशारा वकील ब्रॉवर्ड पार्क यांनी संयोजकांना दिला आहे.

### भारतीय संघाला धक्का

**फ्लोरिडा :** भारतीय संघाचा सुपर-८मधील पहिला सामना २० जून रोजी बार्बाडोस येथे अफगाणिस्तानशी होणार आहे. मात्र, याआधीच भारताला मोठा धक्का बसला आहे. जगातील नंबर वन टी-२० फलंदाज सूर्यकुमार यादव सोमवारी जखमी झाला आहे. यावेळी नेटमध्ये फलंदाजी करताना सूर्याच्या हाताला दुखापत झाली, त्यानंतर फिजिओने येऊन त्याच्यावर प्राथमिक उपचार केले. सूर्याच्या हाताला किती गंभीर दुखापत झाली आहे, याची माहिती अद्याप समोर आलेली नाही.

### प्रशिक्षकाची उचलबांगडी

**नवी दिल्ली :** अखिल भारतीय फुटबॉल फेडरेशनने भारतीय वरिष्ठ पुरूष फुटबॉल संघाचे प्रमुख प्रशिक्षक इगोर स्टिमॅक यांची पदावरून उचलबांगडी केली आहे. भारताला फिफा विश्वचषक २०२६च्या पात्रता फेरीतील तिसऱ्या राऊंडसाठी पात्र होता आले नाही. यानंतर एआयएफएफने हा निर्णय घेतला. भारताचा कतारविरूद्धच्या शेवटच्या सामन्यात २-१ असा पराभव झाला होता. त्यामुळे साखळी सामन्यात भारताला तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले होते.

# अफगाणिस्तानचा लाजिरवाणा पराभव

**। फ्लोरिडा । वृत्तसंस्था ।**


टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या शेवटच्या साखळी सामन्यात वेस्ट इंडिजने अफगाणिस्तानचा १०४ धावांच्या मोठ्या फरकाने पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजने २० षटकांत ५ गडी गमावून २१८ धावा केल्या. प्रत्युत्तरात अफगाणिस्तानचा संघ १६.२ षटकांत ११४ धावांवरच सर्वबाद झाला. टी-२० आंतरराष्ट्रीय मधील धावांच्या बाबतीत वेस्ट इंडिजचा हा आतापर्यंतचा दुसरा सर्वात मोठा विजय आहे.

अफगाणिस्तानचा कर्णधार राशिद खानने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो पूर्णपणे चुकीचा ठरला. २२ धावसंख्यावर वेस्ट इंडिजला पहिला धक्का बसला असला तरी त्यानंतर जॉन्सन चार्ल्स आणि निकोलस पूरन यांनी दुसऱ्या विकेटसाठी जबरदस्त भागीदारी केली. जॉन्सन चार्ल्सने २७ चेंडूत ४३ धावा केल्या. तसेच, निकोलस पुरनने ५३ चेंडूत ९८ धावा केल्या आणि तो धावबाद झाला.




### निकोलस पुरनचे अग्नितांडव

निकोलस पूरनने ५३ चेंडूत ६ चौकार आणि ८ षटकारांसह ९८ धावा ठोकल्या. दरम्यान, अफगाणिस्तान संघासाठी अझमतुल्ला ओमरझाईने तिसरे षटक टाकले. या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर निकोलस पुरनने षटकार ठोकला. त्यानंतर दुसरा चेंडू नो बॉल ठरला, ज्यावर चौकार मारला. दडपणाखाली आलेल्या ओमरझाईने तिसरा चेंडू वाईड टाकला, जो चौकार गेला. अशाप्रकारे, पहिल्याच चेंडूवर अझमतुल्लाहने १६ धावा दिल्या. ओव्हरच्या दुसऱ्या चेंडूवर एकही धाव आली नाही. त्यानंतर तिसऱ्या आणि चौथ्या चेंडूवर पुरनने चौकार मारला आणि पाचव्या आणि सहाव्या चेंडूवर त्याने षटकार ठोकला. अशा प्रकारे अझमतुल्ला ओमरझाईनच्या एका षटकात एकूण ३६ धावा आल्या.



### वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांची कमाल

वेस्ट इंडिजकडून ओबेद मॅकॉयने सर्वाधिक ३ बळी घेतले. यादरम्यान त्याने ३ षटकात १४ धावा दिल्या. याशिवाय अकील हुसेन आणि गुडकेश मोती यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. तसेच, आंद्रे रसेल आणि अल्झारी जोसेफ यांनी ही प्रत्येकी १ बळी घेतला.

वेस्ट इंडिजला ५ गडी गमावत २१८ धावा करता आल्या.

लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेला अफगाणिस्तान संघाला पहिल्याच षटकात सर्वात मोठा धक्का बसला. धावांचा पाठलाग करण्याची जबाबदारी असणारा रहमानउल्ला गुरबाज खाते न उघडता पॅव्हेलियनमध्ये परतला. तो बाद होताच सामना पूर्णपणे वेस्ट इंडिजच्या हातात गेला. इब्राहिम झद्रानने नक्कीच २८ चेंडूत ३८ धावा केल्या पण त्याला उर्वरित फलंदाजांची साथ मिळाली नाही आणि संपूर्ण संघ ११४ धावांवर सर्वबाद झाला.

# निरंजना नागराजनची निवृत्तीची घोषणा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय महिला संघ सध्या दक्षिण आफ्रिकेविरुद्ध एकदिवसीय मालिका खेळत आहे. या दरम्यान भारतीय महिला संघाची वेगवान गोलंदाज निरंजना नागराजन हिने सोशल मीडियावर पोस्ट करत निवृत्तीची घोषणा केली आहे. ती सध्या भारतीय संघाचा भाग नाही आणि तिने २०१६ मध्ये भारतासाठी शेवटचा सामना खेळला होता.

निरंजना नागराजन हिने इंस्टाग्राम पोस्टमध्ये लिहिले आहे की, व्यावसायिक स्तरावर क्रिकेट खेळणे माझ्यासाठी सर्वोत्तम गोष्ट आहे, कारण आयुष्यातील प्रत्येक गोष्ट या पासून सुरू झाली. क्रिकेटमुळे मला आयुष्यात पुढे जाण्याचा दृष्टीकोन आणि कारण मिळाले. जवळपास मी २४ वर्षांपासून व्यावसायिकपणे खेळत आहे. पण आता मी सर्व आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत फॉरमॅटमधून निवृत्ती घेत आहे.



मी सर्वांची ऋणी आहे. पुढे तिने लिहिले की, मी तिन्ही फॉरमॅटमध्ये क्रिकेट खेळली आहे.

२००८ मध्ये तिने भारताकडून एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. २०१६ मध्ये श्रीलंकाविरुद्ध रांची येथे झालेल्या टी-२० सामन्यात ती भारताकडून शेवटची खेळली होती. निरंजनाने भारतासाठी २ कसोटी सामन्यात २७ धावा, २२ एकदिवसीय सामन्यात ७० धावा आणि १४ टी-२० सामन्यात ४२ धावा केल्या आहेत. याशिवाय तिच्या नावावर कसोटीत ४ बळी, एकदिवसीय सामन्यात २४ बळी आणि १४ टी-२० सामन्यात ९ बळी आहेत.

# विश्वविजेत्या संघाचे प्रशिक्षक हतबल

**। लाहोर । वृत्तसंस्था ।**

मितभाषी असा स्वभाव असलेले पाकिस्तान संघाचे नवे प्रशिक्षक गॅरी कर्स्टन यांनाही पाक संघातील वातावरणावर भाष्य करण्यावरून स्वतःला रोखता आले नाही. विखुरलेला संघ अशा शब्दात त्यांनी टीका केली आहे.

भारताच्या २०११ मधील विश्वकरंडक विजेत्या संघाचे प्रशिक्षक असलेले कर्स्टन यांनी मे महिन्यात पार पडलेल्या आयपीएलनंतर पाक संघाच्या प्रशिक्षकपदाची सूत्रे स्वीकारली होती. पाकचा संघ विश्वकरंडक स्पर्धेस रवाना होण्यापूर्वी कर्स्टन यांनी खेळाडूंच्या तंदुरुस्तीबाबत



गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. आता विश्वकरंडक स्पर्धेतील अनुभवानंतर कर्स्टन यांनी हा एकसंध असलेला संघ नाही. मोठ्या प्रमाणात दुफळी असून गटबाजी आहे. कोणी कोणाला सहाय्य करत नाही. प्रत्येक जण वेगवेगळ्या

- **पाकिस्तान हा विखुरलेला संघ**
- **खेळाडूंच्या तंदुरूस्तीवर प्रश्नचिन्ह**

असल्याचा सारखा वागतो. मी अनेक संघासोबत राहिलो आहे, पण अशी परिस्थिती पाहिलेली नाही, अशा तीव्र शब्दात कर्स्टन यांनी नाराजी व्यक्त केल्याचे वृत्त आहे. मुळात स्पर्धेस रवाना होण्यापूर्वीच कर्स्टन यांनी बहुतांशी खेळाडूंच्या तंदुरुस्तीवर प्रश्नचिन्हे उपस्थित केले होते.

# पुण्याच्या सतेजचा आफ्रिकेत डंका

**। डर्बन । वृत्तसंस्था ।**

साउथ आफ्रिका येथे झालेल्या ९७व्या कॉम्रेड्स मॅरेथॉन स्पर्धेत पुणे येथील मायक्रोसॉफ्ट कंपनीत आयटी व्यवस्थापक म्हणून कार्यरत असलेल्या सतेज नाझरे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्यांनी ही आव्हानात्मक स्पर्धा १० तास ०९ मिनिटे २४ सेकंदात पूर्ण केली. या स्पर्धेत एकूण चढाई १७५७ मीटर आणि उतार ११०४ मीटर होता. कॉम्रेड्स मॅरेथॉन स्पर्धा १९२१ मध्ये सुरू झाली असून, यंदाचे वर्ष या मॅरेथॉनचे ९७ वे वर्ष होते.



९ जून रोजी झालेल्या या जगातील सर्वांत जुन्या आणि खडतर मॅरेथॉन स्पर्धेत डर्बन ते पीटरमेरिजबर्ग या शहरांमधून स्पर्धक धावत होते. ही स्पर्धा दरवर्षी एकदा अप आणि दुसऱ्या वर्षी डाऊन अशा स्वरूपात घेतली जाते. अल्ट्रा मॅरेथॉनच्या जगात अतिशय लोकप्रिय आणि आव्हानात्मक असलेल्या या स्पर्धेत ७० पेक्षा जास्त देशांतून स्पर्धक सहभागी होतात.

सतेज नाझरे यांनी या स्पर्धेच्या निमित्ताने महात्मा गांधी आणि नेल्सन मंडेला यांच्या विचारांची प्रेरणा घेतली. स्पर्धा पूर्ण झाल्यावर त्यांनी दक्षिण आफ्रिकेतील फिनिक्स वसाहत येथील गांधीजींच्या घराला भेट देऊन गांधी आणि मंडेला यांना अभिवादन केले.

सतेज नाझरे यांनी गेल्या ७-८ महिन्यांपासून या स्पर्धेची तयारी केली होती. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्पर्धकांना ४२.२ किमीचे मॅरेथॉन अंतर ४:४९:५९ तासांत पूर्ण करणे आवश्यक असते. सतेज यांनी टाटा अल्ट्रा मॅरेथॉनमधून ५० किमी ०५:०५:५१ मध्ये पार करून कॉम्रेड्स मॅरेथॉनसाठी पात्रता मिळवली. त्यांना सताऱ्याचे शिव यादव यांच्या कडून धावण्याचे प्रशिक्षण आणि दिव्यानी निकम यांच्याकडून आहाराबाबत मार्गदर्शन मिळाले.

### सुमीत नागलची एकेरीत प्रगती

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



भारताचा टेनिस स्टार सुमीत नागलची एकेरीतील एटीपी रँकिंगमध्ये मोठी प्रगती झाली आहे. कारकिर्दीतील सर्वोत्तम असे ७१ वे स्थान त्याला मिळाले आहे. गत आठवड्यात तो ७७ व्या क्रमांकावर होता. पेरुगिया एटीपी चॅलेंजर स्पर्धेत तो उपविजेता राहिला. त्यामुळे त्याच्या रँकिंगमध्येही प्रगती झाली. येत्या पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेत एकेरीत खेळणारा तो एकमेव भारतीय असणार आहे. त्याच्या नावावर आता ७७७ एटीपी गुण आहेत.

# इंग्लंडची सार्बियावर निसटती मात

**। गेल्झनकिर्शन । वृत्तसंस्था ।**

सामन्याच्या पूर्वार्धात ज्युड बेलिंगहॅमने साधलेल्या ताकदवान हेडिंग गोलच्या बळावर गतउपविजेत्या इंग्लंडने युरो करंडक फुटबॉल स्पर्धेच्या 'क' गटात सर्बियावर १-० फरकाने निसटता विजय संपादन केला. इंग्लंडने विजयाचे पूर्ण गुण वसूल केले; पण उत्तरार्धात त्यांना गोल नोंदविता आला नाही. इंग्लंडला आता गटात अव्वल स्थान मिळाले आहे.

'क' गटातील आणखी एका सामन्यात स्लोव्हेनियाने पिछाडीवरून डेन्मार्कला १-१ असे गोल बरोबरीत रोखले. १७व्या मिनिटाला ख्रिस्तियन एरिक्सनने डेन्मार्कसाठी गोल केल्यानंतर एरिक यान्झा याने ७७व्या मिनिटाला स्लोव्हेनियास बरोबरी साधून दिली. पुढील लढतीत २० जून रोजी स्लोव्हेनियासमोर सर्बियाचे, तर डेन्मार्कसमोर इंग्लंडचे आव्हान असेल. २० वर्षे आणि ३५३ दिवसांचा असताना बेलिंगहॅम युरो करंडक मुख्य फेरीत इंग्लंडतर्फे गोल करणारा तिसरा सर्वांत युवा फुटबॉलपटू ठरला. बुकायो साका याचा प्रतिस्पर्धी खेळाडूस चाटून आलेल्या क्रॉस पासवर बेलिंगहॅमने १३व्या मिनिटाला अफलातून हेडिंग साधले. उत्तरार्धातील



खेळात सर्बियाने आक्रमणावर जास्त भर देत इंग्लंडला चोख प्रत्युत्तर दिले.

सामन्यानंतर बेलिंगहॅमने इंग्लंडच्या कामगिरीचे विश्लेषण करताना सांगितले की, मला वाटतं, कोणत्याही संघाविरुद्ध आम्ही गोल करू शकतो हे पूर्वार्धात दाखवून दिले आणि कोणत्याही प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध आम्ही क्लीन शीट (गोल न स्वीकारणे) राखू शकतो, हे उत्तरार्धात सिद्ध केले. मात्र, इंग्लंडचा कर्णधार हॅरी केन याने संघाची कामगिरी अपेक्षेनुसार नसल्याचे मान्य केले. तो म्हणाला, एकंदरीत आम्ही विजयासाठी पात्र होतो. उत्तरार्धात काही कालावधीत आम्हाला आमच्या गोलक्षेत्रातच तळ ठोकावा लागला. त्यातून बाहेर पडणे आम्हाला कठीण ठरले, तरीही हा एक महत्त्वाचा विजय ठरला.

# रूमानियाचा विजयी धडाका

**। म्युनिक । वृत्तसंस्था ।**

युरो करंडक फुटबॉल स्पर्धेत रुमानियाचा संघ मागील वेळेस पात्र ठरला नव्हता, यावेळेस त्यांनी धडाकेबाज पुनरागमन साजरे करताना युक्रेनवर सोमवारी ३-० असा दणदणीत विजय नोंदविला. 'ई' गटातील या लढतीत रुमानियाने पूर्ण वर्चस्व राखले. त्यांच्यासाठी कर्णधार निकोलाय स्टानसियू, राझवान मारिन व डेनिस ड्रागस यांनी प्रत्येकी एक गोल केला.

युद्धग्रस्त युक्रेनने तीन वर्षांपूर्वीच्या युरो करंडकात उपांत्यपूर्व फेरी गाठली होती, यावेळी गट साखळीतील पहिल्या लढतीत त्यांना प्रभाव पाडता आला नाही. कर्णधार निकोलाय स्टानसियू याने सणसणीत फटक्यावर रुमानियाने २९ व्या मिनिटाला गोलशून्य बरोबरीची कोंडी फोडली. युक्रेनच्या गोलरक्षकाच्या गोलकिकवर रुमानियाच्या डेनिस मॅन याने चेंडू नियंत्रित केला. त्याने कर्णधारास चेंडू पुरविला. यावेळी ३१ वर्षीय खेळाडूने लाजबाव फटक्यावर संघाला आघाडी मिळवून दिली. विश्रांतीनंतरच्या खेळात रुमानियाने चार मिनिटांत दोन गोल नोंदविल्यानंतर युक्रेनच्या आव्हानातील हवाच निघाली. ५३व्या मिनिटाला राझवान मारिन याने २२ मीटरवरील झंझावाती फटक्यावर केलेला गोल डोळ्यांचे पारणे फेडणारा होता. नंतर ५७व्या मिनिटास प्रतिहल्ल्यावर डेनिस ड्रागस याने दूरवरील फटक्यावर प्रेक्षणीय गोल नोंदविला. यावेळीही डेनिस मॅन याचे असिस्ट निर्णायक ठरले. सामन्याच्या इंज्युरी टाईममध्ये बदली खेळाडू रोमन यारेमचुक याचा जोरदार फटका क्रॉसबारला आपटल्यामुळे पिछाडी कमी युक्रेनची अखेरची संधीही हुकली.





### तीन वर्षांपूर्वी पडले होते हृदय बंद

# ख्रिस्तियन एरिक्सनची जिगरबाज वाटचाल

**। स्टुटगार्ट । वृत्तसंस्था ।**

डेन्मार्कचा ३२ वर्षीय फुटबॉलपटू ख्रिस्तियन एरिक्सन याची फुटबॉल मैदानावरील जिगरबाज वाटचाल प्रेरक, तेवढीच हृदयस्पर्शी आहे. तीन वर्षांपूर्वी युरो करंडक फुटबॉल स्पर्धेत खेळताना भर मैदानात हृदय बंद पडल्यामुळे तो कोसळला होता, आता योग्य उपचारानंतर जबरदस्त पुनरागमन साधताना याच स्पर्धेत गोल करण्याचा पराक्रम त्याने साधला.

कोविड महामारीमुळे २०२० मधील युरो करंडक स्पर्धा २०२१ साली झाली. तेव्हा १२ जून २०२१ रोजी डेन्मार्क व फिनलंड यांच्यातील सामन्यात पूर्वार्ध संपण्यापूर्वी सारे जग क्षणभर स्तब्ध झाले. मैदानावर खेळत असताना एरिक्सनला हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि तो मैदानावर निपचित पडला. डॅनिश संघाच्या कर्णधारावर मैदानावरच तातडीने आवश्यक प्रथमोपचार करण्यात आले आणि लगेच तेथून थेट इस्पितळात हलवावे लागले. आवश्यक उपचार झाले. मरणाच्या दाढेतून तो परत आला. या घटनेनंतर वर्षभरातच या धैर्यवान फुटबॉलपटूने क्लब पातळीवर पुनरागमन केले. कतारमध्ये २०२२ साली झालेल्या विश्वकरंडक स्पर्धेसाठी या जिद्दी खेळाडूची डेन्मार्कच्या संघात निवड झाली आणि आता युरो करंडक स्पर्धेत पुन्हा संघाचा आधारस्तंभ बनला आहे.

हृदयक्रिया बंद पडून मैदानावर कोसळलेल्या त्या भयाण दिवसानंतर आता एरिक्सन पूर्ण तंदुरुस्त आहे. बरोबर १,१०० दिवसांनंतर रविवारी रात्री त्याने स्लोव्हेनियाविरुद्ध युरो करंडकाच्या मुख्य फेरीतील क गटात संस्मरणीय गोल नोंदविला. सामन्याचा मानकरीही तोच ठरला. सहकारी जोनास विंड याच्याकडून मिळालेला चेंडू छातीवर नियंत्रित करत ताकदवान फटक्यावर एरिक्सनने प्रतिस्पर्धी गोलरक्षकास चकविले. नंतर ७७ व्या मिनिटाला एरिक यान्झा याच्या गोलमुळे स्लोव्हेनियाने बरोबरी साधल्यामुळे डेन्मार्कला विजय हुकला.

युरो स्पर्धेत खेळणे नेहमीच खासस्लोव्हेनियाविरुद्धच्या सामन्यानंतर डेन्मार्कचा हुकमी मध्यरक्षक असलेला एरिक्सन म्हणाला, गतवेळच्या तुलनेत यावेळच्या युरो स्पर्धेत माझी कहाणी खूपच वेगळी आहे. सुदैवाने त्या घटनेनंतर मी खूप सामने खेळलो आहे. सामन्यात उतरताना मला खूप आत्मविश्वास वाटतो आणि खेळताना आनंद लुटत आहे. युरो स्पर्धेत खेळणे नेहमीच खास असते. मी खूप आनंदित आहे. युरो स्पर्धेत मी गोल केलेला नाही हे ध्यानात होते, पण माझ्या मनात फुटबॉलव्यतिरिक्त काहीच नव्हते. माझ्या गोलमुळे संघाला मदत झाल्याबद्दल आनंद वाटतो.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)